# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०

## गणपत्रिका क्रमांक : ८२

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • १९३५ • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पाचवे / अंक ७ / जून २००४

## संपादकीय

## ‘आहे रे’ लोकप्रतिनिधींच्या देशातील ‘नाही रे’ जनता

या देशातील निवडणुका, लोकशाही याबाबत कोणाची काय मते असतील ती असो, पण या निवडणुका लढविणारे 'जे' उमेदवार असतात, त्यांच्या कमाईचे आकडे पाहिले की एकमताने सर्वांची मती गुंग होते. ३०-४० वर्षे खर्डेघाशी करताना, कर्जत कसाऱ्यावरुन सी.एस्.टी. गाठताना (अर्थातच उलट येताना) जे आकडे उच्चारतानाही जीभ चाचरेल, जे आकडे लिहायला सांगितले तर अमुक आकड्यावर किती शून्य हा हिशेब करताना नाकी नऊ येतील, असे कल्पनातीत आकडे ही या उमेदवार मंडळींच्या बँक खात्यातील जमा असते. अर्थातच खायचे वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे हा व्यवहार आहे, हे कशाला सांगायचे?

पाच वर्षात एकदाही मतदारांना न दिसण्यासाठी हे निवडून येतात. आपल्या कारकीर्दीत आपण किती भरीव कामे केली,याचे आर्ट पेपरवर अहवाल छापतात, प्रसिद्ध करतात. या अहवालापोटी काही लाखांचा खर्च हे सहजपणे करतात. पाच वर्षांनी मतांचा जोगवा मागायला येतात तेव्हा यांच्या खात्यात ही कल्पनातीत रक्कम जमा होते.

आयुष्यभर खर्डेघाशी करण्यापेक्षा हा राजकारणाचा धंदाच बरा असे सर्वसामान्यांना वाटल्याशिवाय रहात नाही. पाच वर्षात किमान ५० लाख ते कमाल कितीही कोटी याच धंद्यात मिळत असावेत. आयुष्यभर नाकासमोर चालून निवृत्तीनंतरचे मिळणारे चार दोन लाख कुठे, अगदी गोल्डन शेकहँड असला तरी मिळणारे १०-२० लाख कुठे आणि यांचा हा 'बॅलेन्स' कुठे? तुलना करण्याच्या पलीकडचं हे सगळं आहे.

विषम आर्थिक समाजरचना शतकानुशतके तशीच आहे. समाजाची विभागणीच करायची तर 'आहे रे' आणि 'नाही रे' या दोन गटात करावी लागत होती, आहे आणि असणार आहे त्यामुळे श्रीमंत लोकप्रतिनिधींच्या देशातील गरीब जनता असं या देशाचं वर्णन (स्वप्नातही येणार नाहीत असे आकडे पाहून) कोणी केलं तर त्यात गैर काय आहे ?




वर्ष पाचवे / अंक ७ / जून २००४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ८ वे / अंक ११वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | धर्मराज्यस्थापक श्रीकृष्ण | शं. बा. मठ | ३ |
| २) | डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन | डॉ. मो. दि. पराडकर | ७ |
| ३) | सूची-काही दुर्मिळ ग्रंथांची (उत्तरार्ध) | स्मृती जोशी | १४ |
| ४) | ''स्वामी विवेकानंद रामकृष्ण व आपण'' | यशवंत साने | २० |
| ५) | श्रीमद्‌भगवद्‌गीतार्थ | आशा भिडे | ३५ |
| ६) | रसयात्रा | गीतेश शिंदे | ३७ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ४० |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# धर्मराज्यस्थापक श्रीकृष्ण

*भगवान श्रीकृष्णाचे वास्तव चरित्र काय होते, याचा अभ्यासपूर्ण विचार मांडणाऱ्या लेखमालेतील हा चौथा लेख*

*- संपादक*

(लेखांक चौथा)

**धर्मसाम्राज्याची स्थापना :**

लौकिक दृष्टीने भीष्म विरागी श्रीकृष्ण संसारी. भीष्मानी आमरण प्रतिज्ञेचे पालन केले. श्रीकृष्णाने विजयासाठी प्रतिज्ञेचे कवच बाजूला केले आहे. श्रीकृष्ण वयाने भीष्मापेक्षा लहान. त्याच्यासमोर भीष्म नम्र होताना दिसतात. त्याचे कारण काय? याचे कारण श्रीकृष्णाच्या अंत:करणाची ती धारणा असल्याचे आढळून येईल. ती कोणती धारणा -परमेश्वरी धारणा हीच ती धारणा. त्याच्या हातून अनंत कर्मे घडली पण त्या कर्मांची प्रेरणाशक्ती व्यक्तित्वातून अगर अस्मितेच्या केवळ मर्यादेतून स्फुरलेली नव्हती. व्यक्तीची हालचाल दोन प्रकारची असते. १)नैसर्गिक - करणे न करणे व्यक्तीच्या इच्छेवर नसून नैसर्गिकरित्याच ती व्यक्तीला करावी लागतात. श्वासोच्छ्वास हे आपोआप घडणारे स्पंदन, हे नैसर्गिक आहे. २) विशिष्टउद्देश अंत:करणात धरून अनेक कारणास्तव आपल्या कर्मेन्द्रियाच्या द्वारे विशिष्ट हालचाली हे ऐच्छिक कर्म होय. उद्देश वैयक्तिक वा सामूहिकही असू शकेल. मनुष्याची प्रत्येक हालचाल सुखाच्या प्राप्ती प्रीत्यर्थ. दु:खात् उद्विजते सर्व: सर्वस्य सुखं ईप्सितम् ।

ऐच्छिक कर्मांची प्रवृत्ती ही स्वत:च्या सुखाप्रीत्यर्थ असते. अंत:करणाची समता बिघडल्याखेरीज ऐच्छिक कर्मांची प्रवृत्ती होत नाही. वैयक्तिक सुखप्राप्तीच्या व दु:खनिवृत्तीच्या इच्छेने मनुष्य कार्यप्रवृत्त होतो. मनुष्याने मनात सुखाची इच्छा बाळगून केलेले किंवा दु:खाचा संभव टाळण्यासाठी केलेले जे कर्म ते ऐच्छिक कर्म होय. हे ऐच्छिक कर्म स्वार्थी व स्वार्थनिरपेक्ष असे दोन्ही प्रकारचे असते. मानवी जीवनातील वासनामय पशुत्व व मर्यादित व्यक्तिमत्त्व यांचा निरास करून त्याठिकाणी परिपूर्णावस्थेचे देव जीवन उत्पन्न करणे, हा श्रीकृष्णाचा जीवन हेतू. या देवजीवनाच्या निर्मितीला जो जो मार्ग साहायक असेल तो तो धर्म व त्या निर्मितीला येणारे वैचारिक क्षेत्रातील अडथळे हाच अधर्म होय.



राजसत्तेच्या रूपाने या स्वरूपाचा अधर्म स्थिरपद झाल्यामुळे तो नष्ट करून मानवतेचे देव जीवनात रूपांतर करण्यास अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यासाठी व ते स्थिरपद करण्यासाठी धर्म साम्राज्याची स्थापना करणे, हे श्रीकृष्णाचे आवश्यक कार्य झाले. या कार्यासाठी त्याला जो महान प्रयत्न करावा लागला त्यातूनच त्याचे युगपुरुषत्व प्रगट झाले.

**धर्मराज्याचे स्वरूप**

युधिष्ठिराच्या रक्षणामुळे व शत्रूंना ठार मारल्यामुळे अभ्यंतर व बाह्य संकटापासून प्रजेची पूर्णपणे सुटका झालेली होती. स्वत: युधिष्ठिर सत्य धर्माचे आचरण करणारा होता. प्रजेत अशी प्रवृत्ती कशी निर्माण होईल, याची सदैव काळजी तो घेत असे. रक्षण, भरण व विनयाधान हे भारतीय राज्य यंत्राचे कार्य असून ऐतिहासिक वाङ्मयात निर्देशही केला जातो.

रक्षण - प्रजेचीउपासमार होऊ नये. तिचे उपजीवन सुव्यवस्थित चालावे अशी सोय उपलब्ध करून देणे व तद्नुरूप ते चालविणे. धनधान्य समृद्धी, योग्य वाटप. उपजीवनाचा व्यवसाय उपलब्ध करून देणे.

विनयाधान - राष्ट्रातील व्यक्तीच्या अंत:करणातील

सारी क्षुद्रता नष्ट करून उत्कृष्ट शीलचारित्र्य, संपन्नता, निःस्वार्थ कार्यनिष्ठा प्रजेच्या अंतःकरणात बाणविणे हे सर्वांत महत्त्वाचे राज्ययंत्राचे कर्तव्य भारतीय राजनीति शास्त्रवेत्त्यांनी मानलेले आहे. शिक्षणाच्या द्वारे ती प्रत्यक्ष समाजात उत्पन्न करण्याची योजना निर्माण करणे यात प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा अथवा अस्मितेचा विकास अभिप्रेत असतो.

केवळ भरणपोषण करणारे राज्ययंत्र निरुपद्रवी पशुत्वाचे संरक्षण करणारे भारतीय आदर्शांच्या दृष्टीने निकृष्ट प्रतीचे ठरते. समाजामध्ये सर्व प्रकारचे चारित्र्य नांदावे व लोकांच्या कडून आदर्श वर्तणूक घडावी, असे वाटत असेल तर शासनयंत्राचा सूत्रचालक हा अशा आदर्श चारित्र्याचा परिपूर्ण आविष्कार असावा लागतो. राज्ययंत्राचे खरे बळ म्हणजे कोशबल होय. युधिष्ठिराच्या राज्यतंत्राचा धनकोश समृद्ध होता.

## राज्ययंत्राचे वैभव

सर्व मूर्धाभिषिक्त राजे त्याच्या वैभवसंपन्न राजसूयात उपस्थित होते. बाल्हिकाने सुवर्ण रथ, सुदक्षिणाने कांबोजमधील शुभ्र घोडे दिले. शिशुपाल याने उत्कृष्ट ध्वज, एकलव्याने पादत्राणे दिली. सर्व ऋषि, नारद, धौम्य व्यास देवल, असित उपस्थित होते. आपल्या रत्नजडित पांचजन्य शंखातून श्रीकृष्णाने युधिष्ठिराला अभिषेक केला. भारताचा सम्राट म्हणून गौरव केला. अशी धर्मसभा वैभवाच्या पायावर उभी होती.

## धर्मसभेचे सामर्थ्य

भगवान श्रीकृष्ण, अर्जुन, भीमसेन या सभेचे पाठिराखे होते. जरासंध शिशुपाल यांच्या वधामुळे त्यांच्या संबंधित राजेलोक जळत राहिले व काही करता येत नसल्याचा संताप आतल्या आत जिरवत होते. या संतापाचा कधीतरी स्फोट होईल, हे श्रीकृष्ण जाणून होता.

शिशुपालाला यज्ञात उठावणी करायची होती पण श्रीकृष्णालाच युद्धाचे आव्हान दिल्यामुळे त्याचा नाश श्रीकृष्णाने केला. 'अधर्मसंयुक्तं अनर्थं संयुक्तं व्यवहारं वर्जयेत् ।' राजाने अधर्म व अनर्थयुक्त व्यवहार करू नये. ज्या व्यवहाराने स्वतःच्या राज्यालाच धोका निर्माण होईल, असे वर्तन करू नये (कौटिल्य) युधिष्ठिराचा अधर्मयुक्त व्यवहार झाला नाही पण अनर्थयुक्त व्यवहार झाला.

राजसूय यज्ञ आटोपून द्वारकेत गेल्यावर मत्सराग्नीने पेट घेतलेल्या दुर्योधनाने युधिष्ठिराला द्यूताचे आव्हान केले. त्यातील धोका माहीत असूनही युधिष्ठिर तेथे गेला आणि अगदी मिनतवारीने श्रीकृष्णाने निर्माण केलेले धर्मराज्य युधिष्ठिराने द्यूतात घालविले. श्रीकृष्णाला ही वार्ता आधी कळती तर द्यूतच होऊ दिले नसते. चुटकीसरशी हे साम्राज्य नष्ट झाल्याचे पाहतात अत्यंत दुःखी अंतःकरणाने तो युधिष्ठिराला म्हणाला - मी द्वारकेत असतो तरी हा प्रसंग हे युधिष्ठिरा मी तुझ्यावर येऊ दिला नसता. मी हे द्यूत घडू दिले नसते. मी द्वारकेत आल्यावर सर्व वृत्त कळले. ते ऐकून उद्विग्न चित्ताने तुझी भेट घेण्यासाठी तत्काळ येथे निघून आलो.

## धर्मराज्यावरील संकट

चेदी राज शिशुपाल याच्या वधानंतर धुमसणारी संतापाची आग शाल्व रूपाने भडकली. त्यांनी द्वारकेवर हल्ले केले. श्रीकृष्ण त्यावेळी इंद्रप्रस्थात होता. इकडे येताच ही गोष्ट समजली म्हणून श्रीकृष्णाने शाल्वाच्या समाचारासाठी आपली ताकद लावली. २१ दिवस भीषण युद्ध झाले. शाल्व मारला गेला. त्यानंतर श्रीकृष्ण द्वारकेत आला तेव्हा द्यूताची वार्ता कळली.

राज्यव्यवहार राज्यनीतीच्या अनुसारच झाले पाहिजेत. ते तसे न केल्यामुळे निर्माण केलेले धर्मराज्यही फाशाच्या एकाच डावात पार नष्ट झाले. युधिष्ठिराने सत्य धर्मांच्या पालनासाठी वनवास पत्करला. वनवास काळ संपेपर्यंत वाट पाहणे हाच एकमेव मार्ग आता उरला होता.

गांधार शकुनीने युधिष्ठिराला कपट द्यूतात जिंकून लवाडीने राज्य बळकावले व त्याला देशोधडीला लावले. पांडव सत्यतेने वागले. कौरवाची जरी वंचना केली तरी दिलेला शब्द पाळणे आपले कर्तव्य आहे हे जाणून पांडवांनी वनवास पत्करला. दुर्योधन दुष्ट असला, पांडव सज्जन असले तरी दोघांचाही विनाश न होऊ देता धर्मशास्त्र संमत योग्य व यशस्वी तेच केले पाहिजे. धर्मराज अधर्माने कोणतीही गोष्ट स्वीकारणार नाही. पांडवाकडून त्यांचे राज्य कौरवानी जिंकून घेतले नाही. कपटाने द्यूतात - जिंकले ही खऱ्या क्षत्रियाला लाजिरवाणी गोष्ट आहे.

वनवास संपताच अभिमन्यूच्या विवाहानिमित्ताने सर्व राजे लोक एकत्र जमले. मत्स्यदेश (हल्लीचे भरतपूर, नाभा अलवार इत्यादी) इथे श्रीकृष्णानी भावी हालचाली संबंधी प्रस्ताव मांडला. पांडवांची बाजू न्याय असून कौरवानी त्यांच्यावर अन्याय केला आहे, हे ठासून सांगितले. न्याय व बलिष्ठ बाजूकडेच राजे लोकांनी वळावे, ही भूमिका निर्माण केली. महाभारतात उद्योग पर्वाला यामुळे महत्त्व प्राप्त झाले आहे. भारते सारं उद्योग पर्वम् । मंत्रयुद्ध याच पर्वात दृष्टीस पडते. उपस्थित राजे लोकांमध्ये श्रीकृष्णांनी आपली बाजू कौशल्याने मांडली.

साऱ्या अटी पांडवांने पूर्ण केल्या आहेत. आता त्यांचे राज्य ठरल्याप्रमाणे परत करावे, अशी त्यांची स्वाभाविक इच्छा आहे. तरी असे न घडल्यास शूर पांडव कौरवांचा नाश करून राज्य मिळवतील व त्यात न्याय बाजू म्हणून पांडवाना मदत करावी. यावर बराच खल झाला व याबाबत दुर्योधनाचे काय म्हणणे आहे हे समजल्यावर याचा विचार करावा लागेल. ते कळून घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. एक उत्तम दूत कौरवाकडे पाठवावा, त्याने युधिष्ठिराला त्याचे राज्य परत मिळावे, यासाठी प्रयत्न करावा. श्रीकृष्णाचे हे भाषण अत्यंत योग्य काळी झालेले आहे. तेरा वर्षे राजे लोकांच्या दृष्टिपथातून बाजूला झालेल्या पांडवांची बाजू सर्व राजे लोकात भिडणे अत्यंत आवश्यक होते.

द्यूत झाल्यावर लगेच उठाव केला असता तर अनेकांचे सहकार्य लाभले असते. कालांतराने काही गोष्टींची धार कमी होते. द्यूत खेळण्यात युधिष्ठिराची मोठी चूक झाली. धूर्त व द्यूतात निष्णात असलेल्या शकुनीला आव्हान केले. शकुनीने आपल्या धूर्त पद्धतीने युधिष्ठिराचा पराभव केला.

द्रुपद राजाचा पुरोहित कौरवाकडे पाठविण्यात आला. राजा धृतराष्ट्राने त्याला तत्काळ निरोप दिला व संजय बोलणी करण्यासाठी पांडवाकडे येईल, असे त्याला सांगितले.

### तत्कालीन तीन धूर्त

श्रीकृष्ण जन्माच्या काळी आक्रमणकारी साम्राज्यवाद दृढ होत चालला होता. त्या आक्रमणामागे धर्मनीती असे काही नव्हते. जरासंध व कंस या जोडीच्या नेतृत्वाखाली अनीतिमय शासन व्यवस्थेत प्रजेची अधोगती होत चालली होती. चेदी देशचा राजा शिशुपाल असाच शक्तिशाली राजा होता. हा राजा शीलाचा विध्वंसक व साधुजनांचा संहारक होता. त्याच्या केवळ वैयक्तिक स्वार्थाशिवाय दुसरा विचार त्याला सुचत नसे. त्यासाठी तो हवा तो उपाय वापरण्यास कचरत नसे. तिसरा राजा धृतराष्ट्र हा एक नीच कोटीतला राजा. तो अंध होता म्हणून त्याचा भाऊ पंडू राजा झाला. तो धर्मशील होता. काही कारणाने पांडूने धृतराष्ट्रावर राज्य सोपवून वनवास पत्करला. धृतराष्ट्र लबाड व लुच्चा होता. त्याच्या वाणीतून जणू मध ठिपके. खोटे प्रेम त्याला चांगलेच जमत असे. दुर्योधनापुढे मात्र त्याचे काहीच चालत नसे. द्यूतात पांडव हरले, त्यांच्या धर्मपत्नीची विटंबना करण्यात येत असताना धृतराष्ट्र चूप बसला. इतकेच नव्हे कौरवांच्या जयाने त्याला आनंद झाला. तो विदुराला विचारतो - स: विदुरं प्राहद्युते किं जितम् । पांडवांचे ऐश्वर्य द्यूतात लुबाडले ते कसे पचनी पाडावे, याचाच विचार तो करीत असे. पांडवाना त्रास देण्यात प्रोत्साहित करण्याचा इरादाच त्याचा दिसतो. नाव मात्र दुर्योधनाचे. धृतराष्टाने एका प्रसंगी दुर्योधनाला सांगितले - पांडवाना राज्यातून हाकलून लाविले पाहिजे.

दुर्योधन ममाप्येतत् हृदि संपरिवर्तते । अभिप्रायस्य पापत्वात् नैवंतु विवृणोम्यहम् । (आदिपर्व) त्यामुळेच धृतराष्ट्रांने दुर्योधनाच्या प्रत्येक कृतीकडे दुर्लक्ष्य केले. धृतराष्ट्राला पांडवांचा नाश अभिप्रेत होता. फक्त उघडपणे दाखवत नसे इतकेच.

### राजसत्तेची आवश्यकता

धर्मेणैव प्रजा: सर्वा: रक्षन्ति: स्म परस्परम् । स्वत:च्या कर्तव्याद्वारे व सामाजिक नीतिद्वारे बांधलेली प्रजा योग्य वर्तन करीत होती त्यामुळे शासन संस्थेची गरज भासली नाही. मानवाचे हे अति उच्च नैतिक जीवन होय. पण जेव्हा सामान्य मानवातून कर्तव्य भावना व सांस्कृतिक विचार, आचारातून विचारातून व श्रवणातून निघून जातात. तेव्हा संयम, त्याग यांचा लोप होतो. शेवटी मोहाला जीवनात स्थान मिळते. ज्ञानावस्थेला तिलांजली मिळते. वासना व काम अमर्याद वाढतात अशावेळी उच्चनैतिक भूमिका प्रस्थापित करण्यासाठी शासन संस्थेची आवश्यकता असते. या संस्थेच्या संचलनासाठी कर्तव्यनिष्ठ माणसाची गरज असते.

### धर्मसंस्थापना

श्रीकृष्णासमोर मुख्य प्रश्न राजसत्तेचे शुद्धीकरण करून तपस्वी सत्ता प्रस्थापन करण्याचा होता. तसे घडले तरच स्वाध्याय व तप समाजात वाढणारे होते. भोगविषयाच्या ठिकाणी प्रेमाचे व त्यागाचे साम्राज्य स्थापावयाचे, अशी श्रीकृष्णाची इच्छा होती. अनियंत्रित सत्तेला लचावलेले राजे भोगविलास व भौतिक सुखालाच जीवनाचे सर्वस्व मानणारे होते. अशा लंपट व अनीतिमान राजाना सुधारणे अशक्य म्हणून विद्यमान राजसत्तेला उलटून टाकून जर नव्या राजसत्तेची प्रस्थापना करण्यात आली तरच देशात सुखशांतीचे व न्यायाचे साम्राज्य स्थापणे शक्य आहे. श्रीकृष्णाला पांडवांच्या अलौकिक चारित्र्याची, उत्कृष्ट उच्च नैतिक जीवनाची माहिती होती. पांडवांना निमित्त करून धर्मस्थापनेसाठी श्रीकृष्ण त्यांच्याकडे धावला.

महाभारतात राजा व त्याची कर्तव्ये सांगितलेली आहेत.

एवं विप्रअनधीयाना राजा यश्च न रक्षिता। मेघो न वर्षते यश्च सर्वथा ते निरर्थका: ।

न शिकलेला ब्राह्मण, रक्षण न करणारा राजा, न वर्षाव करणारा मेघ हे सर्व निरर्थक होत.

राजा कशासाठी - प्रियप्रिये परित्यज्य सम: सर्वेषु जन्तुषु । कामं क्रोधंच लोभंच मानंचोत्सृज्य दूरत: ।

आत्मा जेया सदा राज्ञा ततो जेयाश्च शत्रव: । अनितात्मा नरपति: विजयेत् हि कथं रिपून् ।

कालो वा कारणं राजा राजा वा कालकारणम् । इति ते संशयो माऽभूत राजाकालस्य कारणम् ।

आवडनिवड याचा त्याग करणारा, सर्व प्राणिमात्रांना सारखे लेखणारा, काम, क्रोध, लोभ व मान आदींना दूर ठेवणारा, राजा स्वत:ला जिंकतो असाच राजा शत्रूंना जिंकतो. जो स्वत:वरती ताबा मिळवत नाही तो शत्रूंना कसे वठणीवर आणील. काल राजाला निर्माण करतो व राजा काळाला निर्माण करतो याबद्दल मनात शंका बाळगण्याचे काही कारण नाही. कारण राजाच काळ निर्माण करतो. याबाबत भीष्म म्हणतात - वर्तितव्यं सदा राजा गर्भिणी सहधर्मिणाम् । गर्भवती स्त्री ज्या रीतीने बालकाची काळजी घेते त्याचप्रमाणे राजाने प्रजेची काळजी वाहिली पाहिजे. प्रजेवर त्याचे वात्सल्य प्रेम असल्यासच असे घडणे शक्य आहे.

(क्रमश:)

**शं. वा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन

*चरित्र-लेखन हा साहित्याचा मोठा उद्बोधक आणि रंजक प्रकार आहे. धर्म, साहित्य, राजकारण, इतिहास या निरनिराळ्या क्षेत्रात गाजलेल्या लोकांची चरित्रे मराठीत प्रसिद्ध आहेत. यापैकी काही या व्यक्तींना मानणाऱ्या लोकांनी लिहिली तर यापैकी काहींनी स्वत:च आपल्या जीवनाचा आढावा घेतला. यापैकी पहिला प्रकार जीवनातील घटनांचे क्रमानुसार चित्रण करणारा, इतिहासाच्या दृष्टीने अधिक महत्वाचा कर्लाइल ने इतिहास म्हणजे समाजातील मानमान्यता पावलेल्या लोकांची चरित्रे असे म्हटले ते एका अर्थाने खरेच. दुसरा प्रकार आत्मकथनाचा. याचा एक मोठा आदर्श अर्थातच लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' यात घटनांपेक्षा आठवणींना अधिक महत्त्व. या घटनांमधून चरित्र उलगडत जाते. अशा आत्मकथनात त्या-त्या व्यक्तीच्या आयुष्याच्या जडणी-घडणीला अग्रक्रम असतो. असावा. सहाजिकच यामध्ये त्या-त्या व्यक्तीचे कडू-गोड अनुभव स्वाभाविकपणाने येतात. या अनुषंगाने परिवारातील सदस्यांचे, सभोवतालच्या माणसांच्या व्यक्तींच्या भावनात्मक आरोहअवरोहांची कंपने म्हणून चरित्र-कथनापेक्षा खऱ्या इतिहासाचे पदर उलगडून दाखवणारी ठरतात. यामुळे समाजाचे सामर्थ्य आणि उणीवा यांच्यावर प्रामाणिकपणाने प्रकाश टाकणारा हा साहित्यप्रकार अधिक रंजक ठरतो. डॉ. मो. दि. पराडकर यांचे क्रमश: प्रकाशित होणारे प्रस्तुत आत्मकथन या दृष्टीने मोलाचे ठरेल असे वाटते. - संपादक*

भाग -१

माझे आजोबा बापूराव नानल. माझी आई म्हणजे वस्तुत: माझ्या वडिलांची मामेबहीणच होती. हे बापूराव नानल फार यशस्वी शेतकरी होते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शेतीचा विकास केला. त्याकाळीसुद्धा ब्राह्मण (म्हणजे भट) याला हे नांगर धरणारे लोक जरा कमी दर्जाचा समजत असत, कष्टाच्या दृष्टीनं, ताकदीच्या दृष्टीने, बोलून दाखवत नसत. पण मनात असे. माझे आजोबा मात्र त्याला अपवाद होते. त्यांच्या तारुण्यात म्हैस जर अंगावर आली, तर म्हशीची शिंगे धरून तिला ते थोपवून धरीत असत. ही काही साधी गोष्ट नाही! आणि माळवद असतं शेतामध्ये. रात्रीच्या वेळी एका प्रसंगी माळवदावरून चोर आले त्यांची चाहूल ऐकू आली. शिव्या देत. (गावातलं सगळं वातावरण .. सारख्याच शिव्या असत ! त्याला फारसा अर्थ असे असं नाही.) रात्री चाहूल लागल्यावर हे शिडी चढून वर गेले. 'कोण आलय ते बघतो' असे म्हणाले. त्यांच्या ताकदीची चोरांनाही कल्पना होती. त्यामुळे पटापट उड्या मारून ते पळाले. पण जाताना त्यांचा म्होरक्या असं म्हणाला की, 'बामणा, पुनवेच्या चांदण्याला आता बघ.' हे म्हणाले, 'मला एवढा थांबायला वेळ नाही. आता बघू या.'' आणि माझे हे आजोबा त्याच्यामागे दोन मैल पळत गेले. त्याला पकडले पेच घालून पाडलं. मग तो गयावया करू लागला, क्षमा मागितली तर त्याला पुरून टाकतो असेच म्हणत होते. अशी निर्भयता हा त्यांचा वारसा, तसा त्यांचा वचक फार होता. एका ब्राह्मणाचा एवढा वचक हा त्याकाळीसुद्धा जरा अपवादात्मकच होता. पण माझं लहानपणीचं फारसं रहाणं मार्डीला (म्हणजे सोलापूरहून साडेदहा मैलावर) फारसं झालं नाही. मी राहिलो परभणीला आणि हैद्राबादला. माझ्या आजोबांचे दोन धाकटे भाऊ. एक नोकरीला होते मोगलाईत. (खऱ्या अर्थाने मोगलाई. म्हणजे मुसलमानांच्या बाजूची आणि हिंदूंवर शक्य तितका अन्याय

करायला उत्सुक) परभणीला माझे हे धाकटे आजोबा वकील होते. मेहबूबगंज म्हणजे वकीलांचा गंज, असं होतं. वाडा होता. परंपरेनुसार यांनीही उत्तम शेती केली. त्या शेतीबरोबर आंब्याची झाडं लावली. जवळजवळ २०० आंबा होता. दृष्टी आणि हौस, दोन्ही असल्यामुळं त्यांनी आंब्यांच्या जवळजवळ सर्व जाती आपल्या त्या आमराईत लावल्या होत्या. मलगोवा म्हणतात, तोतापुरी म्हणतात, नीलम म्हणतात, या सगळ्या आंब्यांची आम्हाला तेव्हापासून माहिती होती. त्यावेळेला घरात लहान असा मुलांपैकी मीच होतो. त्यामुळे माझ्यावर या लोकांनी प्रेमाचा वर्षाव केला. माझे हे धाकटे आजोबा म्हणजे गोविंदराव नानल मराठवाड्यात पुढे भागानगर सत्याग्रहामध्ये पहिले प्रेसिडेंट झाले. पण मुळात राहणारे परभणीचे. वकिली परभणीला. पण हे दोन्ही भाऊ - म्हणजे मोठे आजोबा आणि धाकटे आजोबा असे आम्ही त्यांना म्हणत असू - हैद्राबादच्या भटजीबापू नावाच्या संताचे अनुग्रहीत होते. त्यावेळेला आम्हाला पुष्कळवेळेला हैद्राबादला या संताच्या दर्शनास जावे लागे. भटजीबापू हे संत तर खरेच, पण अतिशय उत्तम गायक. गाणं हा व्यवसाय नाही. कारण व्यवसाय करणं त्यांना पसंत नव्हतं. पण गाण्याची तयारी अतिशय उत्तम. नावाजलेला गायक आपला अभिमान त्यांच्यापुढे बाजूला ठेवीत असे, इतकी त्यांची तयारी होती. एक उत्तम मुसलमान गायक त्यावेळेला हैद्राबादला आला. 'यह बम्मन क्या गा सकता है' असा त्याचा अहंकार होता. भटजीबापूंनी असं ठरवलं, की काही बोलायचं नाही. पण तो जिथं रहात होता तिथल्या जिन्यावर बसून त्यांनी राग म्हटला आणि काही न बोलता परतले. हा मुसलमान गायक आश्रमात धावत आला आणि त्यांच्या पायावर डोकं ठेवून म्हणाला, 'मुझे मुआफ कीजिए । इस तरह का गाना मैंने सुना नहीं था ।'

त्यांचे गायनामधले शिष्य म्हणजे माझे मोठे आजोबा. फार चांगले गात असत. पार्थिव पूजा करण्याची पूर्वी पद्धत असे. पार्थिवाची मूर्ती करायची आणि दैनंदिन पूजेमध्ये तो पार्थिव समोर ठेवून गायचं. आमचं दुर्दैव हे की आम्हाला त्यावेळेस गाण्यातलं काही कळत नव्हतं. कारण ही जवळजवळ १९३७ ची गोष्ट. एकदा गावात बालगंधर्व आले होते. गायला आमच्या या मोठ्या आजोबांना निमंत्रण होतं. गाता गाता एकदा रागामधला वर्ज्य स्वर चुकून लागला. सबंध समाजामध्ये आमच्या मोठ्या आजोबांनीच फक्त टाळी वाजवली. 'अरेच्या ! सांपडला!' अशा अर्थाची. बालगंधर्व म्हणाले, ज्यांनी टाळी वाजवली त्यांना बोलावून आणा. तो खरा संगीतातला दर्दी आहे. बालगंधर्व म्हणाले, ''तुम्ही माझ्याकडे या. गायनाच्या क्षेत्रात चमकाल.' पण यांनी सांगितलं. 'मला माझ्या गुरूंची अनुज्ञा लागेल.' भटजीबापूंच्या आश्रमात गेल्यावर त्यांनी सांगितले, 'नाही. गायनाचा व्यवसाय करायचा नाही. त्यामध्ये अनेक गोष्टी होतात आणि गायनातला दर्जा मात्र कमी होतो.' त्यामुळे हे गेले नाहीत.

धाकटे आजोबा फार नाणावलेले वकील. त्यांच्या वकीलीच्या ज्ञानामुळं त्यांना मेहबूबगंजामध्ये तर मान होताच. पण मुसलमान वकीलही त्यांना मानत असत. एकदा असं झालं की परभणीच्या कोर्टामध्ये जजनं चुकीनं यांच्यावर ठपका ठेवला, वकिलीच्या दृष्टीनं त्यांनी हे सहन केलं नाही. धाकटे आजोबा म्हणाले, 'मी माझ्या अशीलाची बाजू मांडतो आहे. तुम्ही माझे शब्द फिरवता आहात.' हे सगळं अर्थात् उर्दूमधून. 'मला अधिकार आहे तुमचा प्रतिवाद करण्याचा.' मुसलमान जज. त्याचा प्रतिकार एक हिंदू वकील करतो. त्या जजने न्यायालयाची बेअदबी होते आहे असं म्हणत यांचा वकीलीचा परवाना तात्पुरता रद्द केला. अन्याय सहन न करणं हे आमच्या घरातच आहे ! त्यामुळे हे म्हणाले, आता मला ही केस लढवायलाच हवी. परभणीच्या कोर्टात केस यांच्याविरुद्ध गेली. कारण सगळंच वातावरण जजच्या बाजूचं. पण हायकोर्ट मात्र हैद्राबादला होतं. हे म्हणाले, शेंडी तुटो की पारंबी. यांनी हैद्राबादला केस नेली. दोन-तीन वर्ष केस चालली. त्यावेळीसुद्धा एवढा

वेळ लागत असे. हायकोर्टातही त्यांनी वकील दिला नाही. ३-४ वर्ष जवळजवळ अज्ञातवासात गेली. कारण वकिलीचा परवाना रद्द. शेती होती; पण त्यातून वकिलीसारखं उत्पन्न मिळणं शक्य नव्हतं. शेवटी ५-६ वर्षांनी निकाल आमच्या धाकट्या आजोबांच्या बाजूनं लागला त्या मुसलमान जजला आपलं न्यायालयाचं स्थान सोडावं लागलं. निकाल देताना न्यायाधीशांनी सांगितलं की, आप बड़े ही लायक वकील हैं । इसलिए हालांकि आप एक वकील है, आपको एक कुर्सी मिलनी चाहिए कोर्टमें । आणि त्यांनी यांना खुर्ची द्यायला लावली. कारण त्यांचं ज्ञान ! जोडीला भरभक्कम पुरावे देऊन बाजू मांडण्याचं कसब !

मी घरात पहात होतो, मला हळुहळू कळायला लागलं होतं. घरात उत्तम ग्रंथालय होतं. वकिलीवरचे बहुतेक सगळे ग्रंथ त्यांच्याकडे होते. जी गोष्ट वकीलीच्याबाबतीत, तीच गोष्ट आमचा धर्म, आमची संस्कृती आणि आमच्या भाषा यांच्या बाबतीत होती. त्यांचं उर्दू, (उर्दूचं मूळ फारसी आहे) संस्कृत चांगलं. (हिंदी ही उर्दूचीच एक शैली त्याकाळी मानत असत म्हणून तोही काही प्रश्न नव्हता.) वडील भावामुळे संगीताचं ज्ञान होतं. घरातला सर्वात लहान मुलगा मी. त्यामुळे मला मांडीवर घेऊन ते गीतेतले श्लोक म्हणत. सूरदासाची पदं म्हणत असत. भटजीबापूंच्या अनुग्रहामुळे या सर्वांमध्ये त्यांना गती होती. पुढे मी सूरदास हा विशेष कवी म्हणून घेतला; त्याचं मूळ याच्यात आहे. त्यावेळी मी ती पदं ऐकली आणि माझ्यावर प्रेम असल्यामुळे मला त्यांनी शिकवायला सुरुवात केली. वयाच्या पाचव्या वर्षी मला त्यांनी दसऱ्याच्या उत्सवामध्ये पंधरावा अध्याय म्हणायला सांगितला. त्यावेळेला त्याचा अर्थ कळणं शक्य नव्हतं. पण स्वच्छ उच्चार कसे असावेत हे मला त्यांनी शिकवलं. पंधराव्या अध्यायात वीसच श्लोक आहेत. मी म्हणून दाखवला. जमलेल्या लोकांना आवडला. मुलाचं कौतुक असतंच. चांदीचा बिल्ला मला तेव्हा त्यांनी दिला. अजूनही तो माझ्या संग्रही आहे. असं म्हणता येईल की गीतेची माझी सुरुवात त्यांनीच केली. पुढे मी गीता पाठ केली व आज ही माझ्या नित्य पाठणात गीतेच्या तीन अध्यायांचा समावेश होतो. त्याच ही श्रेय मुळात त्यांना देणे योग्य.

माझं घराणच मोरोपतांचं असल्यामुळे साहित्याचं प्रेम मला वारशानंच मिळालेलं आहे. तेव्हा प्रेम असणं हा मी गुण मानत नाही. नसणं हेच अस्वाभाविक झालं असतं ! कारण माझे आजोबा प्रत्यक्ष राजेरामराय म्हणून जे हैद्राबादचे राजे होते, त्यांच्या पदरी कीर्तनकार होते. त्यांचा सहवास मिळाला नाही, किंबहुना त्यांना मी पाहिलंच नाही. त्यामुळे एकंदर जे मला वातावरण मिळालं तेच मुळी साहित्याच्या प्रेमाला पोषक असं होतं. मला आठवतं, एकदा धाकट्या ओजबांचा गीतेतला श्लोक चालला होता, 'आर्तो जिज्ञासु: अर्थार्थी, ज्ञानी असे चार प्रकारचे लोक जगात असतात. काही आर्त म्हणजे अडचणीत सापडले म्हणून, कांही जिज्ञासू म्हणून, कांही आपला मतलब साधण्यासाठी आणि काही ज्ञानाबद्दल प्रेम म्हणून उपासना करतात. मी सुमारे ८-९ वर्षाचा असेन. त्या वयातल्या मुलाला मला काहीतरी येत हे दाखवण्याची हौस असते. त्यामुळे या चार लोकांमध्ये चांगला कोण हे मला त्यांनी विचारलं. तेव्हा मी सांगितलं, 'ज्ञानाबद्दल प्रेम असणारा श्रेष्ठ ! आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी हे त्यामानाने खरे उपासक नव्हते ! तेव्हा ते म्हणाले, 'आहे; हा बच्चा काहीतरी करील त्याला आत्तापासूनच यामध्ये रुची आहे.' पांचव्या वर्षापासूनच मी हे सर्व ऐकत असल्यामुळे मला एवढी गती प्राप्त झाली असावी !

माझे वडील मात्र तिथे राहू शकत नव्हते. कारण ते मुंबईला 'इनलॅण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंट'मध्ये क्लार्क होते मुंबईला. वाईट गोष्ट अशी की दीड वर्षाचा असतानाच माझी आई क्षयानं गेली. त्यावेळी क्षयावर काही इलाज नसे. त्यामुळे आठवणी अशा जवळजवळ नाहीतच. केवढं दुर्दैव ! पण ती ज्या ज्या वेळेस मुंबईला यायची, तेव्हा

माझे नातेवाईक मला नंतर सांगतात - की ती अतिशय चांगलं कीर्तन-प्रवचन करायची. मी ही जी व्याख्यानं देत आलो, तो वारसा मला तिच्याचकडून मिळाला असावा, असं मला वाटते.

माझ्या आजोबांना ज्ञानाबद्दल प्रेम होतं, तशीच अज्ञानाबद्दल चीडही येत असे. घरात धर्मकार्य वगैरे होत असे. करडभाजने म्हणून एक शास्त्री आमच्याकडे पौरोहित्य करायला येत. त्यांना आधीच आमच्या या धाकट्या आजोबांनी सांगितलं होतं, की पहा, पैशाचा प्रश्न नाही पण तुम्ही जी माणसं बोलवाल त्यांना ते जे मंत्र म्हणतील, त्यांचा अर्थ माहीत असला पाहिजे. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि अशी २-३ माणसं आणली ज्यांना ते मंत्र कशातले आहेत हेही सांगता येईना. त्यामुळे आमचे आजोबा फार संतापले त्यांनी सांगितलं, 'मी अज्ञान्यांना दक्षिणा देत नसतो आणि मी तुम्हाला यासंबंधीची जाणीव दिली होती. त्या करडभाजन्यांना आपला हा अपमान वाटला की आपण ज्यांना बोलावलं, त्यांना हे दक्षिणा द्यायची नाही म्हणतात ! म्हणून त्यांनी सर्व मेहबूबगंजामध्ये सर्वांना सांगायला सुरुवात केली की गोविंदरावांना फार अभिमान झाला आहे; ब्राह्मणाची किंमत ते ठेवत नाहीत, वगैरे वगैरे हिंदू वकिलांनी त्यांच्याकडे लक्षच दिले नाही. मुसलमान वकील जे होते त्यांनी करडभाजन्यांना आत बोलावलं. त्यांचं ऐकून घेतलं आणि मग म्हटलं, 'तुम गलत कहते हो । गोविंदराव ऐसा नहीं कर सकते। आप जाइये यहाँसे । परभणी का कोई भी मुसलमान वकील आपकी केस नहीं लेगा । क्योंकि हम सब लोक गोविंदराव की इज्जत करते हैं । अदालत में उनके सामने खड़ा रहना बड़ा मुश्किल है ।'

मुद्दा असा की, जसं ज्ञानाबद्दल प्रेम होतं तशी अज्ञानाबद्दल चीड होती. फसवणूक चालणार नाही : तेव्हा मी असं म्हणतो की मला वारसाच फार चांगला मिळाला आहे : त्यामुळे आज लोक असं म्हणतात, तुम्हाला हिंदी चांगलं येतं, तुमचं संस्कृत चांगलं आहे, मराठी तुम्ही चांगलं बोलता. पण हे सगळं भाषांबद्दलचं प्रेम आहे. यामध्ये इंग्रजीही येईल - ती सगळी आमच्या धाकट्या आजोबांची देणगी आहे. मी ५ वर्षांपासून जवळजवळ हायस्कूलला येईपर्यंत त्यांच्याजवळ परभणीला राहिलो. रोज त्यांच्याकडून मी गीता ऐके. त्यांच्यासमोर बसून संस्कृत श्लोक मी म्हणत होतो. सूरदासानं एके ठिकाणी असं म्हटलंय, 'कामधेनु तजि छेरी कोन दुहावे ।' म्हणजे कामधेनू सोडून बकरीचं दूध कोण पिणार?' सूरदास हा हिंदीचा फार जबरदस्त कवी आहे. हे सर्व माझ्या धाकट्या आजोबांचं ऋण आहे. साहजिकच लहानपणापासून माझे फार कौतुक होतं आणि मी संस्कृत हा विषय घेतला याला खरं कारण धर्म आणि संस्कृतीविषयी त्या काळात मला लहानपणात मिळालेली शिकवण. मुद्दाम शिकवायचं म्हणून त्यांनी शिकवलं नाही, पण असं वातावरणच होतं. रवींद्रनाथांनी असं म्हटलंय, की आमचं घर हे विद्यालय होतं. सुदैवानं ही गोष्ट आमच्या धाकट्या आजोबांच्या घराच्या बाबतीत खरीच आहे. ज्याचा धनु राशीचा गुरु असतो त्याला व्यासंग जवळचाच असतो. म्हणजे मी व्यासंग केला असं सुद्धा म्हणता येणार नाही ! व्यासंगाला एकंदर तो गुरु अनुकूलच आहे ! त्याला मी तरी काय करणार ! (संस्कृत विषय मी घेतला त्याला कुंडली उपोद्बलक आहे. कारण धनुराशीचा म्हणजे स्वगृहीचा गुरु जुन्याबद्दल म्हणजे प्राचीन संस्कृतबद्दल आस्था दाखवतो.'

मी बी.ए.ची परीक्षा संपूर्ण संस्कृत घेऊन म्हणजे आठही प्रश्नपत्र संस्कृत घेऊन १९४५ मध्ये दिली. धाकट्या आजोबांशी संबंधित ही गोष्ट असल्याने ती आधी घेतली आहे. मुंबई विद्यापीठ त्यावेळी खूप मोठं होत. सिंधसुद्धा त्याच्यामध्ये येत असे. त्यावेळी आम्हा दोघांना प्रथम श्रेणीत पहिला क्रमांक मिळाला. त्यामुळे आमच्या रुईया कॉलेजला त्यावेळेस प्रथम विद्यापीठ स्तरावर मान्यता मिळाली. पण

माझं दुर्दैव असं की मी धाकट्या आजोबांकडे हैद्राबादला गेलो. त्यावेळी ते बोलण्याच्या सुद्धा परिस्थितीत नव्हते. अर्धांग झालेला होता. त्यांना आपल्याच सगळ्यात वडील भाऊ (म्हणजे माझे आजोबा) आपली सगळी संपत्ती आपल्याच म्हणजे नानलांच्या घरात रहावी म्हणून त्यांनी माझ्या आजोबांच्या तिसऱ्या मुलाला (म्हणजे तो माझा भाऊच) दत्तक घेतला. पण या दत्तक प्रकरणामुळे वैरच निर्माण झालं. हे त्यांचं दुर्दैव. मी ज्यावेळी १९४५ मध्ये 'श्रीपाद गजानन आचार्य शिष्यवृत्ती' आणि 'भाऊ दाजी पारितोषिक' मिळवून गेलो, त्यावेळेला त्यांना कौतुक करणंच शक्य नव्हतं. शेवटचे दिवस होते त्यांचे ते, जुलै महिना असावा तो. कारण जूनमध्ये परीक्षेचा निकाल लागला आणि मी तिकडे गेलो. ज्यादिवशी तिकडे गेलो, त्यादिवशी मात्र त्यांनी लोकांना लिहून असं सांगितलं, तुम्ही आमच्या मोरयाचं व्याख्यान ठेवा. दुसऱ्या अध्यायातला श्लोक आहे. तो फार चर्चित श्लोक आहे. त्यावर त्यांनी मला बोलायला सांगितलं. मी बोललो पण ते ऐकायलासुद्धा येऊ शकले नाहीत. मला दुसऱ्या दिवशी खरं रहायचं नव्हतं. पण का कुणास ठाऊक. मला असं वाटलं की आज आपण रहायला हवं. 'रात्री ते गेले. भागानगरचे पहिले प्रेसिडेंट म्हणून गोविंदराव नानल सर्व मोगलाईत विख्यात होते. त्यामुळे मला असं आठवतं की त्यादिशी त्यांना श्रद्धांजली द्यायला सरोजिनी नायडूसुद्धा आल्या होत्या. आमच्या आजोबांनी संबंध भाग्यनगरात म्हणजे हैद्राबादेत काँग्रेसची संघटना बांधली होती. त्यांना कायद्याचं ज्ञान असल्यानं ते अध्यक्षही होते. योगायोगाने त्यावेळी फार जोराचा पाऊस पडला. मी असं म्हणतो. निसर्गानं त्यांना ही वाहिलेली आदराची अंजली होती. हा अर्थात् माझ्या भावनेचा भाग असेल. पण परिस्थिती मात्र तशी होती हे खरं.

जसं आजोबांचं तसं काकांचंही माझ्यावर प्रेम फार. एक याचं कारण म्हणजे मी सर्वात लहान. यांनी आमच्या चुकांवर पांघरुण घातलं नाही. जेवताना पानात काही टाकू नये कारण मग अन्न आपल्याला शाप देतं, अशी त्यांची आम्हाला शिकवण होती. त्यामुळे मला असं आठवतं की एकदा मी पानात काहीतरी टाकलं आणि मग भीतीने माळवदावर जाऊन लपलो. त्यांनी मला शोधून आणून त्याची शिक्षा द्यायची ती दिलीच. अजाणतेपणानंसुद्धा वाईट काही हातून घडता कामा नये याबद्दलचा आजोबांचा एक आग्रह होता. खरे सत्याग्रही होते ते.

माझ्या जीवनातला हा फार दुःखाचा भाग आहे की ज्यांना माझ्याबद्दल अभिजात प्रेम होतं, ती माणसं राहिली नाहीत. त्यामुळे एक तऱ्हेचं रितेपण माझ्या जीवनात निर्माण झालेलं आहे. कदाचित् त्याचा एक चांगला परिणाम असा झाला असेल. वाईटातून चांगलं निघतं म्हणतात तसं - त्यामुळेच मी साहित्यात अधिकाधिक गुंतत गेलो. कौतुक आणि प्रेम ज्यांनी व्यवहारात द्यावं, ते न राहिल्यामुळे मी ते सर्व वाङ्मयातच बघत आलो. मी हे धाकट्या आजोबांच्या आजही पांढरी शेरवानी आणि अचकन घातलेली त्यांची धीर गंभीर परंतु माझ्या बाबतीत सदैव हसरी मूर्ती डोळ्यासमोर आहे. आईच्या बाबतीत एवढे म्हणण्याचे भाग्यही माझ्या भाळी नाही.

'Logic is द सायन्स ऑफ सायन्सेस' ही व्याख्या पाठ करीत होतो. दुसऱ्या दिवशी परीक्षा. तर आमच्या या आतोबांचे एक भाऊ म्हणाले एकंदर. तुला काही फर्स्टक्लास मिळेलसं वाटत नाही.' त्यांना नाना म्हणत असत, आजोबांनी मान डोलवत ती त्यांना म्हटलं, 'नाना, मला फर्स्ट क्लास द्यायचा की नाही हे ठरवायला सुदैवानं युनिव्हर्सिटी आहे.' मला ते म्हणाले, 'हे मात्र लॉजिकल This is logic' मी म्हणालो, 'I have taken it.'

मी बी.ए.ला फर्स्टक्लास फर्स्ट आलो. पेढे घरी घेऊन आलो होतो. आत्याबाईंचे यजमान होते. मला म्हणाले, 'काय, पास झालास का?' म्हटलं, 'हो.झालो.' मावशी म्हणाल्या, 'अहो, तो बोलत नाही आणि तुम्हीही पर्वा

करीत नाही? पण तो पास झाला हे खरं नाही. तो फर्स्टक्लास फर्स्ट झालाय, त्याला युनिव्हर्सिटीने बक्षिस दिले.' तात्पर्य एकूण वातावरण मला निरुत्साहित करणारेच होते !

माझं सगळं शिक्षण स्कॉलरशिपवर. मी त्यावेळी शिकवण्या करीत असे. एकदा केव्हा तरी सहामाही असताना रविवारी आम्ही जेवायला बसलो होतो. आमच्या आतोबांच्या वकील मित्राची मुलगी आमच्या वर्गात होती. त्या मुलीबद्दल त्यांना फार प्रेम आणि माझ्याबद्दल अप्रेम ! तर ते म्हणाले, 'काय ती मुलगी आहे; कसा तिने अभ्यास केलाय ! किती टक्के मार्क तिला आहेत आणि तुला किती टक्के आहेत?' मी हळूच सांगितलं, 'तिच्या आणि माझ्या मार्कांमध्ये बारा टक्क्यांचा फरक आहे. तिला तेवढेच कमी आहेत.' मी असं आता अनुभवावरून म्हणू शकेन की माणसानं उत्तराला प्रत्युतर करू नये, त्यानं मोठेपणा सिद्ध होत नाही ! काळानं या लोकांवर सूड उगवला. जे आमच्या आत्याबाईंचे यजमान माझा उल्लेख करायला तयार नव्हते, त्यांना माझा 'हिंदी' प्रचारकांनी सत्कार केला तेव्हा हजर राहायला लोकांनी मुद्दाम बोलावलं आणि तत्कालीन मुंबईचे महापौर नरसिंग होते, त्यांच्या अध्यक्षतेखाली हा सत्कार झाला. हिंदी भाषी काशीप्रसाद द्विवेदी यांनी त्या सत्कारात असं म्हटलं की 'खडी बोली खड़ी तो है ही, लेकिन पराडकरजीका स्पर्श पाते ही वह बहने लगती है । और पराडकरजीकी यह खासियत है कि वह तीनों भाषाओंके ऐसे ज्ञाता हैं कि हमको पता ही नहीं था कि हम लोग सिखा रहे थे और आप उपस्थित थे ! नहीं तो हमारी कोई मजाल नहीं कि हम बोलें । इनमें त्रिवेणी संगम है ।' हे सगळं ऐकायला काळाचा सूड म्हणून आमचे आतोबा उपस्थित होते ! त्यांनी मला नंतर विचारलं, 'अरे, लोग कहते हैं आपमें तो त्रिवेणी संगम है ।' मी म्हटलं, 'जाऊ द्या, म्हणतात खरं लोक' तेव्हा हे असं आहे. माणसाने नेहमी योग्य वेळेची वाट पहावी.'

'न हि कस्तूरि का मोद: शपथेन निवार्यते' असं संस्कृतात सुभाषित आहे. जर तुमच्यामध्ये खरोखर आमोद असेल तर तो केव्हातरी लोकांना कळतोच. त्यासाठी फार गडबड करू नये ! आवश्यकता नाही ! तेवढं धैर्य म्हणजे वाट बघण्याची तयारी माणसानं ठेवावी असा माझ्या जीवनातला अनुभव आहे !

जे प्रोफेसर मला असं म्हणाले होते कि इंटरला याला फर्स्टक्लास मिळणार नाही त्या प्रोफेसरांनी नंतर मी एकंदर या क्षेत्रात काय काय केलं हे ऐकलं आणि मला म्हणाले, 'की त्याचं सगळंच निराळं आहे हो !' कारण त्यांच्याच मुली, पुतण्या पुढे रुईया कॉलेजात माझ्या विद्यार्थिनी झाल्या. हे योग आहेत !

आतोबांचे जे भाऊ 'ब्रिटिश टॅब्लेटिंग कंपनीत' होते असा मी मागे उल्लेख केलाय ते मला कस्पटासमान लेखत. पण त्यांची मुलगी मंदा तिने कॉलेजमध्ये संस्कृतच घेतलं आणि योगायोगाने ती माझी विद्यार्थिनी झाली ! ती जेव्हा बी.ए.झाली तेव्हा तिने आग्रह करून मला वडिलांकरवी रीतसर बोलावणं केलं मी जाऊ शकलो नाही. मग तिनं मुंबईला खाजगी समारंभ करवला मला फोन करून तिच्या वडिलांनी सपत्नीक बोलावलं. म्हणून मी नेहमी म्हणतो की कुठल्याही मनुष्याची परिस्थिती बदलत असते हे लक्षात ठेवून त्याच्या व्यक्तित्वाचा उपमर्द करू नये. तो जर केला तर त्याचं फळ भोगावं लागतं ! हे मोरोपंत भागवत त्यांच्या मुलींनी सांगितल्यामुळे माझ्याशी फार आस्थेने आणि आपुलकीनं वागू लागले. काही वेळा शिकवता शिकवता गुरु होऊन जातात ! खांडेकर शिरोड्याला शिक्षकच होते. त्यामुळे त्यांनी हे म्हणणं स्वाभाविकच आहे. मला स्वत:ला असं वाटतं की त्यावेळेला माझी परिस्थिती वाईट होती, हा आता फक्त इतिहास आहे. ते आता आठवायचं ते फक्त आठवणींच्या लेखनापुरतेच! १९४५ ते १९४७ मी शाळेत शिकवलं. १९४७ मध्ये रुईया कॉलेजमध्ये मी जेव्हा आलो. त्यावेळी रुईयामधल्या मुलांना कळलंच नाही की माझी

परिस्थिती कशी आहे ! कळायचं काही कारण नाही ! १९४७ मध्ये माझे वडील गेले म्हणजे त्यांनी मी एम्. ए. पहिल्या श्रेणीत झालो हेही पाहिलं नाही ! हेही अर्थात् माझे दुर्दैवच.

मला एम्. ए. ला फर्स्टक्लास मिळाला. पण मी गेलोच नव्हतो रिझल्ट आणायला. आमची एक हिंदीची विद्यार्थिनी गेली होती. तिचं नाव कु. रत्नावली नरवणे. तिने सांगितलं होतं की 'पराडकरजी, तुम्ही नका जाऊ. मी जाऊन तुमचा रिझल्ट आणते. तुम्ही कशाला जायचं?' मी म्हटलं, 'बरं तू आण. तिने या भागवत मंडळींना सांगितला माझा रिझल्ट. ती आली त्यावेळेला मी नव्हतो. सौ. आत्याबाई म्हणाल्या, 'अरे ती तुझ्याबद्दल फारच चांगलं बोलत होती.' हे त्यांनी माझ्या आतोबांसमोर म्हटलं हे विशेष. पण तोपर्यंत माझे यश पाहण्याची त्यांना सवय झाली होती ! तेव्हा 'लिखितमपि ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः' त्याचा विचार कशाला करायचा ! आमचे एक सहकारी वर्गात असं सांगत असत (असं मुलांनी मला नंतर सांगितलं) 'तुम्हाला कल्पना येणार नाही आई-वडील लहानपणी गेले की कसं होतं. ते सगळं आम्हीच अनुभवलेलं आहे.' तो मनुष्य पूर्वीचा आमचा विद्यार्थी नंतर माझ्याकडे येऊन सांगत होता, 'अहो सर, तुमची याच्यापेक्षा वाईट परिस्थिती होती. पण तुम्ही एका अक्षराने उल्लेख केला नाहीत.' मी म्हटलं, 'हा उल्लेख करण्यासाठी मला नेमलेलं नव्हतं ! मला नेमलं होतं कालिदास शिकवायला. मी एकेठिकाणी जेवतो, दुसऱ्या ठिकाणी शिकवतो आणि तिसऱ्या ठिकाणी झोपायला जातो, याच्याशी याचा काय संबंध आहे ?

(क्रमशः)

**डॉ. मो. दि. पराडकर**

*पुणे येथील एक संशोधक समीक्षक विद्वान श्रीयुत रामचंद्र चिंतामण ढेरे (जन्म १९३०) यांनी जमविलेला हस्तलिखितांचा संग्रह त्यांनी ठाणे येथील 'प्राच्य विद्या अभ्यास संस्थे'चे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्याकडे नुकताच सुपुर्त केला. (एप्रिल २००४)*

*श्रीयुत ढेरे हे भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे या संस्थेत उपसंपादक होते. या कोशाच्या खंड ३ व ४ मध्ये यांनी अनेक महत्त्वपूर्ण नोंदींचे लेखन केले आहे. श्री. ढेरे यांचा व्यासंग फारच मोठा आहे. भारतीय संस्कृती, प्राचीन साहित्य, लोकसाहित्य, लोक कला प्रकार, रंगभूमी, महाराष्ट्रातील धर्म, धार्मिक स्थळे इ. अनेक विषयांवर संशोधनात्मक लेखन त्यांनी केले आहे.*

*'खंडोबा', 'लोक संस्कृतीचे उपासक', 'चक्रपाणी', 'संत साहित्य आणि लोकसाहित्य', 'लज्जा गौरी', 'श्री विठ्ठल : एकमहासमन्वय', 'संत, लोक आणि अभिजन' असे अनेक ग्रंथ त्यांनी समर्थपणे लिहिले आहेत. त्यांच्या विद्वत्तेचा व मौलिक संशोधनाचा गौरव करण्यासाठी पुणे विद्यापीठाने त्यांना डी.लिट् ही पदवी प्रदान केली. त्यांच्या अनेक ग्रंथांना शासकीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. 'श्रीविठ्ठल : एक महासमन्वय' या त्यांच्या ग्रंथाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे.*

*चतुरस्र बुद्धीच्या तसेच विद्वान व संशोधक अशा श्री. रा. चिं. ढेरे यांचा, त्यांना सखोल अभ्यासासाठी लागणारा प्राचीन हस्तलिखितांचा तसेच ग्रंथांचा संग्रहही अफाट असला तर नवल नाही. ठाणे येथल प्राच्य विद्या अभ्यास संस्था भारत शास्त्र (इंडॉलॉजी) या विषयाच्या अभ्यासासाठी संशोधकांना व अभ्यासकांना जुनी व दुर्मिळ हस्तलिखिते छापील पोथ्या तसेच ग्रंथ उपलब्ध करून देत आहे. गेली वीस वर्षे ही संस्था ठाणे नौपाडा येथील शाहू मार्केटमध्ये संशोधकांसाठी व अभ्यासकांसाठी ग्रंथालय चालवित आहे. हे ग्रंथालय अनेक विद्वान व व्यासंगी व्यक्तींच्या ग्रंथ-देणगीतून उभे राहिले आहे. यात डॉ. जॉर्ज मोरेस, श्री. चिं. वेलणकर, डॉ. मो. दि. पराडकर, त्र्यं. ग. गुप्ते, पंढरीनाथ देशमुख, डॉ. अर्जुन वाडकर, गणेशशास्त्री शेंड्ये आदि मान्यवरांचे ग्रंथ भांडार देणगी म्हणून मिळाले आहे.*

*श्री. रा. चिं. ढेरे यांच्या अमूल्य हस्तलिखित संग्रहात संत साहित्याची अनेक दुर्मिळ हस्तलिखिते उदा. रामविजय, भक्तिविजय, संत विजय, काही मोडी हस्तलिखिते इत्यादि सुमारे पाचशे हस्तलिखिते संस्थेकडे जमा झाली आहेत. संस्थेचा आजचा हस्तलिखित संग्रह सुमारे चार हजारापर्यंत पोहोचला आहे.*

*श्री. रा. चिं. ढेरे यांचे ग्रंथदानाबद्दल ठाणेकर अभ्यासक कायमचे कृतज्ञ राहतील, यात शंका नाही.*

# सूची - काही दुर्मिळ ग्रंथांची (उत्तरार्ध)

ठाण्यातील प्राच्यविद्या संस्थेच्या ग्रंथालयातील १९ व्या शतकातील काही दुर्मिळ पुस्तकांची ही सूची अभ्यासकांसाठी देत आहोत. या संदर्भात अधिक माहिती लागल्यास या संस्थेच्या २५३८८३५८ या दूरध्वनी क्रमांकावर श्री. विश्वनाथ शेंड्ये यांच्याशी संपर्क साधावा.

- संपादक

(मागील अंकावरून पुढे चालू)

५१) **सांख्यतत्वकौमुदी** -लेखक मिश्रा, वाचस्पती संपादक पंडीत तारानाथ (Acc. No.: १५११६ )

प्रकाशना संबंधी माहिती कलकत्ता प्रेस, कलकत्ता. १८९७ आवृत्ती : २री

सारांश : हे एक तत्वज्ञानावर आधारित पुस्तक आहे.

५२) **भामती** - संपादक मिश्रा, वाचस्पती (Acc. No.: १५१२१)

प्रकाशना संबंधी माहिती सरस्वती मुद्रणालय, कलकत्ता.१८९१

सारांश : तत्वज्ञानावर आधारित एक संस्कृत ग्रंथ आहे.

५३) **वनपर्व** - लेखक मुक्तेश्वर (Acc. No.: १३७५)

प्रकाशना संबंधी माहिती श्री शिवाजी छापखाना, पुणे.१८७८

सारांश :पांडव वनात जातात त्या काळाला वनपर्व म्हटले आहे.त्याचे वर्णन यात आहे.

५४) **महाराष्ट्र भाषांतर** - अनुवादक मोघे, बापूशास्त्री (Acc. No.: १२०८)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर छापखाना, मुंबई १८८६ आवृत्ती : ३री किमंत: ६ रुपये

सारांश : धर्मसिंधु नावाच्या ग्रंथाचे मराठीत भाषांतर केलेले आहे.यात धर्माबद्दल माहिती दिलेली आहे.(धर्माबद्दल माहिती देणारा पहिला ग्रंथ आहे)

५५) **कोलापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास** - लेखक मोडक,बाळाजी प्रभाकर (Acc. No.: ११४१)

प्रकाशना संबंधी माहिती अर्थबोध छापखाना, कोलापूर१८८६ किमंत: १रु ५०पैसे

सारांश : कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील सारा इतिहास यात दिलेला आहे. कोल्हापूर मराठ्यांच्या स्वाधीन झाल्यापासून संभाजी महाराज्यांच्या अखेरीपर्यंतचा इतिहास यात आहे.

५६) **महाभारत** - लेखक मोरोपंत संपादक ओक, वामन दाजी (Acc. No.: १५५७४)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय -सागर प्रेस, मुंबई.१८९४ किमत : दिड रुपये

सारांश : याला वनपर्व असेपण म्हटले आहे. यात पांडवांनी वनवासात जेवढे दिवस काढले त्याचे वर्णन काव्यरुपाने आहे.

५७) **मंत्रभागवत** लेखक मोरोपंत संपादक ओक, वामन दाजी (Acc. No.: १५५८३)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर प्रेस, मुंबई.१८९४ किमत : दिड रुपये

सारांश :नमो भगवते वासुदेवाय हा मुख्य मंत्र घेऊन त्यांनी ३३२ श्लोक रचले आहेत. श्लोकाचा प्रत्येक पहिला शब्द घेतला तर ११ श्लोकाचे मिळून नमो भगवते वासुदेवाय हा मंत्र तयार होतो.

५८) कादम्बरी -संपादक मोरेश्वर
(Acc. No.: १५२२९)

प्रकाशना संबंधी माहिती १८९६

सारांश : बाणभट्टच्या कादंबरीचे सार यात दिलेले आहे.

५९) नाटवाटप्रहसनम् - लेखक यदुनन्द (Acc. No.: ५२१)

प्रकाशना संबंधी माहिती गोपाळ नारायण व कं., मुंबई.१८९१ किंमत: ६ आणे

सारांश व्यंगात्मक संस्कृत नाटक वेगवेगळी पात्रे घेऊन केलेले आहे.

६०) सवालास प्रतिसवाल (व्याख्यान) - व्याख्यानकार योगी, बाळकृष्ण गणेत्र
(Acc. No.:१५७२ )

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर छापखाना, मुंबई.१८९९ किंमत : दिड आणा

सारांश : प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनी केलेल्या ब्राह्मण म्हणवणाऱ्यास सवाल या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी हे व्याख्यान दिले. यात मुंजीबद्दल माहिती दिलेली आहे.

६१) श्री अभंगबध्द अध्यात्म रामायण -

लेखक राघवदास (Acc. No.: १२७१)

प्रकाशना संबंधी माहिती जगध्दितेच्छु छापखाना, पुणे.१८७८ किंमत: ३आणे

सारांश बालकांड,सुंदरकांड,अरण्यकांड इ.प्रकारच्या रामायणाचे भाग अभंगरुपाने दिलेले आहेत.

६२) चित्र मीमांसा - लेखक राजजगन्नाथ
(Acc. No.: १५७७)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर छापखाना, मुंबई.१८९३ किंमत : १५ आणे

सारांश :ही एक संस्कृत काव्यमाला आहे. यात संस्कृत श्लोकाबरोबरच त्याचे मराठी भाषांतरही आहे.

६३) बालरामायणन्नाम - लेखक राजशेखर संपादक शास्त्री, गोविंददेव (Acc. No.: ८०९)

प्रकाशना संबंधी माहिती मेडिकल हॉल प्रेस, बनारस.१८६९ किंमत: २ रुपये.

सारांश : हे एक संस्कृत नाटक आहे. या नाटकाद्वारे रामचंद्राचे संपूर्ण व्यक्तीचित्र रेखाटले आहे. राजशेखर हे प्रसिध्द, प्राचीन कवी होते.

६४) अरण्यकांड -लेखक लेले, काशिनाथ वामन
(Acc. No.: १७१३)

प्रकाशना संबंधी माहिती - मोदवृत्त छापखाना, वाई.१८९८ किंमत : दिड रुपया

सारांश :वाल्मिकी रामयणातील राम अरण्यात गेला त्या संस्कृत भागाचे मराठीत भाषांतर आहे.

६५) लघुसिध्दान्त कौमुदी - लेखक वरदराज संपादक शर्मा, बालकृष्ण (Acc. No.: १५१०३)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर मुद्रणालय, मुंबई १८९९

सारांश : हे एक व्याकरणावर आधारित पुस्तक आहे.

६६) श्रीनिवासविलासचम्पू - लेखक व्यंकटेश कवी संपादक पंडित दुर्गाप्रसाद परब, काशिनाथ पांडुरंग
(Acc. No.:५४२)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर प्रेस, मुंबई.१८९३

किंमत:१४ आणे.

सारांश : ही एक काव्यमाला आहे. व्यंकटेश कवी यांनी 'श्री विष्णूची' स्तुती अतिशय संदर अशा काव्यरुपाने संस्कृतमध्ये केली आहे.

६७) सार्थ वाग्भट - लेखक वाग्भट संपादक गर्दे, गणेत्र

कृष्ण (Acc. No.: १५३६०)

प्रकाशना संबंधी माहिती आर्यभूषण छापखाना, पुणे.१८९०

सारांश अष्टांगहृदय या पुस्तकाचे मराठीत भाषांतर आहे. यात आर्युवेदाचा इतिहास, रोग, औषधी वनस्पती इ. बद्दल वेगवेगळी माहिती यात आहे.

६८) **विवादचिन्तामणि** - लेखक वाचस्पती (Acc. No.: १६९५)

प्रकाशना संबंधी माहिती श्री व्यंकटेश्वर मुद्रणालय, मुंबई.१८९८

सारांश :धर्माबद्दल जे नियम घालून दिलेले आहेत त्याची माहिती यात आहे.

६९) **यथार्थदीपिका** - लेखक वामन पंडित भाषांतर कर्ते ओक, वामन दाजी (Acc. No.: ७७७)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर प्रेस, मुंबई.१८९६

सारांश : वामन पंडित यांनी गीतेवरील काही भागावर टीका केलेली आहे.त्याचेच मराठी भाषांतर वामन ओक यांनी आपल्या या पुस्तकात केलेले आहे.यात अर्जुनविषादयोग, सांख्ययोग इ. गीतेतला भाग या पुस्तकात टीकारूपाने दिलेला आहे.

७०) **सुंदरकाण्ड** - लेखक वाल्मिकी भाषांतर कर्ते लेले, काशिनाथ वामन (Acc. No.: ७८६)

प्रकाशना संबंधी माहिती वाई मोदवृत्त छापखाना,वाई.१८९९

किंमत :२रुपये.

सारांश : वाल्मीकि यांनी लिहलेल्या संस्कृत रामायणाचे मराठीत भाषांतर आहे.त्याला 'सुंदरकाण्ड' असे नाव दिले आहे.यात संपूर्ण रामायण आहे.

७१) **श्रीमच्छंकरदिग्विजय** - लेखक विद्यारण्य संपादक आपटे, महादेव चिमणाजी (Acc. No.: ५०४)

प्रकाशना संबंधी माहिती आनंदाश्रम मुद्रणालय, पुणे.१८९१

किंमत: ६रुपये

सारांश या पुस्तकात शंकराचे वेगवेगळे गुण सांगून स्तुती केली आहे.

७२) **जीवन्मुक्तिविवेक** - लेखक विद्यारण्यस्वामी संपादक पणशीकर, पंडित वासुदेवशास्त्री (Acc. No.:१२७५)

प्रकाशना संबंधी माहिती आनंदाश्रम मुद्रणालय, पुणे. १८९० किंमत: १रु३०पैसे

सारांश हे तत्वज्ञानावर पुस्तक आहे. माणसाचे जीवन व मुक्ती यावर तत्वज्ञान सांगितलेले आहे.

७३) **प्रबोधचन्द्रिका** - लेखक वैजलभूपती संपादक खाडिलकर, हरिपंत (Acc. No.: १५३०१)

प्रकाशना संबंधी माहिती हरिपंत खाडिलकर छापखाना, शास्त्री.१८८७

सारांश :हे पुस्तक व्याकरणावर आधारित आहे. व्याकरणाविषयी सर्व माहिती यात आहे.

७४) **दानसंग्रह** - लेखक श्रीकृष्णदास,खेमराज (Acc. No.: ६९१)

प्रकाशना संबंधी माहिती श्री.व्यंकटेश्वर मुद्रणालय, मुंबई .१८८५

सारांश :दानांचे प्रकार किती, कशाप्रकारे दान करतात, कोणाकोणाला दान करावे इ. माहिती यात आहे.उदा. ताम्रदानम्, शिबिकादानम् ,घतदानम् इ.

७५) **श्रीजैमिनी अश्वमेध** - लेखक श्रीधर

(Acc. No.:११७१)

प्रकाशना संबंधी माहिती माझगाव प्रिंटींग प्रेस, मुंबई १८८७ किमंत: ३रु

सारांश :अश्वमेध यज्ञाबद्दल, त्याच्या इतिहासाबद्दल संपूर्ण माहिती,इतिहास काव्य रुपाने दिलेला आहे.

७६) श्रीमद्भागवतार्थ दर्शन - (Acc. No.: ८६३)

प्रकाशना संबंधी माहिती आर्यसेवक छापखाना, मुंबई.१८९१ किमंत:४ आणे.

सारांश : हे भागवताचे मराठी भाषांतर आहे. भक्तिरसायनातील सुरस श्लोक यात आहे. दशस्कंधातील २९ पासून ३३ पर्यंत अध्याय ५(रासपंचाध्यायी) यात भाषांतर करुन दिले आहे.

७७) विश्वगुणादर्शचम्पू - लेखक श्रीमद्वेंकटाध्वरि (Acc. No.:१६९२)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर छापखाना, मुंबई.१८९९ किंमत : १ रुपये

सारांश :वेगवेगळ्या धार्मिक क्षेत्रांचे वर्णन संस्कृत मध्ये केलेले आहे. उदा. काशी, बद्रिकाश्रम.

७८) विश्र्वगुणादर्शचम्पू - लेखक श्री व्यंकटाध्वरि, सुब्बाशास्त्री (Acc. No.: १५२६२)

प्रकाशना संबंधी माहिती कर्नाटक मुद्रणालय, मुंबई. १८८९

सारांश विविध तिर्थक्षेत्रांचे वर्णन यात केलेले आहे.

७९) शारीरक -लेखक शर्मा, कृपात्रम (Acc. No.: १५२०५)

प्रकाशना संबंधी माहिती जगनाथ शर्मा छापखाना, कात्री. १८८६

किंमत :दिड रुपये

सारांश वेदाबद्दल माहिती सांगणारे एक संस्कृत पुस्तक आहे.

८०) ईशादिदशोपनिषत्संग्रह संपादक शर्मा,हरिप्रसाद (Acc. No.: १५२०६)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर छापखाना, मुंबई.१८९३

सारांश उपनिषदातल्या वेगवेगळ्या गोष्टींचा संग्रह या पुस्तकात केलेला आहे.

८१) विवेकचूडामणी लेखक शंकराचार्य (Acc. No.: १५१४२)

प्रकाशना संबंधी माहिती सुबोधप्रकाश छापखाना, मुंबई.१८९२ किंमत: १० आणे.

सारांश :आत्मानात्मविचार व तत्वज्ञान यात सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे ईश्वरप्राप्तीचा मार्ग कसा व कुठला आहे हे पण सांगितलेले आहे.

८२) शब्दव्युत्पत्ति कौमुदी - लेखक शास्त्री, राजाराम (Acc. No.: ७५१)

प्रकाशना संबंधी माहिती इन्दुप्रकाश मुद्रणालय, मुंबई.१७९४

सारांश :या पुस्तकात लेखकाने संस्कृतमधून व्याकरणाबद्दल, भाषेबद्दल माहिती दिली आहे.

८३) भागवत शंकरानिवारण मंजरी - लेखक शिवसहाय (Acc. No.: १५६८८)

प्रकाशना संबंधी माहिती लखौनो प्रिंटींग प्रेस, लखनौ.१८९६

किंमत : दिड रुपये

सारांश :यात शंकांचे शास्त्रीय पध्दतीने निवारण केलेले आहे.

८४) तुकारामांच्या अभंगांची गाथा - संपादक सप्तर्षी, शंकर त्र्यंबक मोतीवाले, हरगोबिंद हरिगोपाळ (Acc. No.: १५२७०)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर छापखाना, मुंबई.१८९६ किंमत : अडीच रुपये

सारांश :तुकारामांचे अभंग व प्रसंगानुरूप चित्रे यात दिलेली आहेत.

८५) **श्री शिवकाव्यस्य** - संपादक साने, काशिनाथ (Acc. No.: ११४३)

प्रकाशना संबंधी माहिती १८८४

सारांश :यात शिवाची स्तुती संस्कृत श्लोकामध्ये केलेली आहे.

८६) **सुश्लोकलाघवम्** संपादक साने, काशिनाथ नारायण (Acc. No.: ११४२)

प्रकाशना संबंधी माहिती १८९५ आवृत्ती : २री

सारांश : भक्तीवर्णन, ब्रम्हवर्णन याचबरोबर त्यांचे प्रकार यांची माहिती संस्कृत श्लोकाद्वारे यात दिलेली आहे.

(८७) **श्री योगवासिष्ठ** संपादक सालेमहंमदकी, शरीफ (Acc. No.: १५३६१)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर छापखाना, मुंबई १८९३

सारांश :वाल्मिकी लिखित या संस्कृत पुस्तकाचे हिंदीत भाषांतर आहे.यात वैराग्य प्रकरण व मुमुक्ष प्रकरणाबद्दल माहिती दिलेली आहे.

८८) **प्रियदर्शिका** - लेखक हर्षदेव संपादक गद्रे,विष्णु दाजी (Acc. No.: ८६५)

प्रकाशना संबंधी माहिती निर्णय-सागर प्रेस, मुंबई.१८८४ किंमत:५०पैसे.

सारांश :हे एक संस्कृत मनोरंजनात्मक नाटक आहे.याला प्रियदर्शिका हे नाव दिले आहे कारण यातल्या नायिकेचे नाव आहे.

८९) **कविरहस्यम्** - लेखक हलायुध (Acc. No.: १५२६६)

प्रकाशना संबंधी माहिती गोपाळ नारायण कं. छापखाना, मुंबई.१८९९ किंमत : ८ आणे

सारांश :हालयुध यांनी लिहलेल्या वेगवेगळ्या कविता मराठीतून दिलेल्या आहेत.

९०) **भारतमंजरी** - लेखक क्षेमेंद्र संपादक परब, काशीनाथ पांडुरंग शिवादत्त (Acc. No.:१५३२८)

प्रकाशनासंबंधी माहिती निर्णय -सागर छापखाना, मुंबई.१८९८ किंमत : ५ रुपये

सारांश : ही महाभारतावरील एक संस्कृत काव्यमाला आहे.

91) **History Of England (I)** Author Babington, Thomas (Acc. No. 1279)

Publication Information Spottiswoode & Co., London 1849 Ed.: 3rd

Summary Its all about history of England. It is first part.

92) **History Of England (II)** Author Babington, Thomas( Acc. No. 1280)

Publication Information Spottiswoode & Co., London1849 Ed.: 3rd

Summary Its all about history of England.

It is second part.

93) **History Of England (III)** Author Babington,Thomas (Acc. No. 1281)

**Publication Information** Spottiswoode & Co., London1856

Summary Its all about the history of England. It is third volume. It gives the information from 1689.

94) **Second Book of Sanskrit**
Author Bhndarkar,Ramkrishna Gopal
(Acc. No. 872)

Publication Information Nirnay-Sagr

press, Bombay 1892 Ed.: 8th

Prize: 12 Anne

Summary It is a Sanskrit-English book. This book is all about Sanskrit grammar, the general rules of grammar.

95) **The French Revolution** Author Carlyle, Thomas ( Acc. No. 1287)

Publication Information Broadway pub., London 1898

Summary Its all about the history of French Revolution.

96) **Mountstuart Elphinstone**

Author Cotton,J.S. Editor Hunter, William Wilson (Acc. No. 1308)

Publication Information Clarendon press, London1896

Summary It's a book of Rulers of India and their History.

97) **Principles Of Murathee Grammer**

Author Stevenson,D.D.(Acc. No. 692)

Publication Information Thacker & Co., Bombay.1854 Ed:.3rd

Summary This book contains all the basic Marathi words, letters, pronoun, verbs, adverbs, syntax, tenses, rules for poetry & basic Grammer.

98) **General Sketch Of European History**

Author Freeman,Edward (Acc. No. 1371)

Publication Information Macmillan & Co., London 1880

Summary It is a sketch of European history. It is a general sketch of the history of the civilized world.

99) **The life of W.E. Gladstone** (Acc. No. 1341)

Publication Information Bradbury, Agnew & Co., London 1898

Summary It is autobiography of him. He is a great politician.

100) **The Raghuvansa** Author Kalidas Editor Nandargikar, Gopal Raghunath (Acc. No. 1623)

Publication Information Arya- Bhushan press, pune.1897 Ed.: 3rd

Summary Translation of Kalidasa's Raghvansa into English. it gives the details of Raghu Raja.

101) **Man The Master Piece** - Author Kellogg, J.H. (Acc. No. 4635)

Publication Information International tract Society, London.1894

Summary It gives the information about the different stages in human being, like Boyhood, Youth & Manhood.Explanation of Human Body.

102) **Brief History of India** - Author Taki,R.S. (Acc. No. 325)

Publication Information Bombay, 1894 Ed:. 3rd

Summary This book gives all the details about Ancient India, Mughal Empire, Governer Generals, etc. very briefly.

103) **Bhagwat Gita** - Author Wilkins, Charles (Acc. No. 1428)

Publication Information Subhodh-prakash press, Bombay.1885

Summary It is a translation of Sanskrit Bhagwat gita into English.

(समाप्त)

स्मृती जोशी
ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी वर्ग,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

●●●

# "स्वामी विवेकानंद रामकृष्ण व आपण"

*स्पिरिच्युअलिझमचा अभ्यास असणारे श्री. यशवंत साने यांनी सदर लेखात रामकृष्ण व विवेकानंदाच्या जीवनप्रसंगातील महत्त्वपूर्ण भागावर अभ्यासपूर्ण चर्चा केली आहे. - संपादक*

स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल पुष्कळ साहित्य लिहिले गेले आहे. 'विवेकानंदांची' अनेक प्रचार केन्द्रे कार्य करत आहेत. पण, विवेकानंदांच्या जीवनाकडे बघण्याच्या दृष्टिकोनांत कोणते प्रकार दिसतात. एक आधुनिक अध्यात्मवादी व्यक्ती हिंदू धर्माचा पुरस्कार करताना व त्यातील सुधारणेचा आग्रह धरणारा ब्रह्मचारी आणि समाजसत्तावाद व विज्ञान यांच्यावर हिंदूधर्माच्या प्रकाशात टीका व मर्यादा दाखवणारा एक विचारवंत वगैरे वगैरे अनेक पैलू !! त्यांच्या विलक्षण तेजस्वी जीवनाचा चरित्रात्मक खंडात्मक पसाराही मांडला गेला आहे. अमेरिकेतील "शिकागो" येथील प्रसिद्ध व्याख्यान व त्याच्या जागतिक धर्म परिषदेवर झालेल्या अनुकूल परिणामाचीही "कथा" अनेक वेळा वाचण्यात ऐकण्यात येते. कन्याकुमारीची शांत व धीरगंभीर वास्तूही अनेकांनी पाहिली असेल.

## अध्यात्मिक (स्पिरीच्यूअल) क्रांती

पण, मला या मूळ "नरेन्द्र दत्त" या बंगाली तरुण व्यक्तीची व रामकृष्ण परमहंस या अद्भुत अवतारी पुरुषाची जी परस्पर पूरक जीवनयात्रा झाली तिच्या 'ऐतिहासिक वैशिष्ट्याकडे' लक्ष वेधायचे आहे. त्यामागील वैशिष्ट्यपूर्ण 'स्पिरीच्यूअल क्रांतिकडे' लक्ष वेधायचे आहे. तसे, या दोघांच्या आध्यात्मिक, गूढात्मक व्यापाराबद्दल तशी अनाकलनीय 'कथावर्णने' भरपूर उपलब्ध आहेत. पण ती केवळ कुतूहल, मनोरंजन, आदर, अनाकलनीय श्रद्धा जागवणारी या टप्प्यापर्यंतच मर्यादा संभाळून राहिली आहेत !! मग, कोणती गोष्ट नजरेतून सुटली आहे ?

नरेन्द्र दत्त या पदवीधर बंगाली व्यक्तीचे 'प्रतीक' हे त्याकाळच्या भारतातील बंगाल प्रातांतील बुद्धीवाद्यांचे प्रतिनिधीत्व करणारे मानायला हवे. ब्रिटीशांच्या साम्राज्यवादाच्या भारतावरील आक्रमणाबरोबर भारतावर केवळ 'राजकीय' अतिक्रमण झाले असे मानून भागणार नाही. पाश्चात्य भौतिकवादी, बुद्धिप्रामाण्यवादी संस्कृतीचेही जोडीने आक्रमण व प्रभावशाली वजन भारतीय तात्कालिन संस्कृतीवर झाले असे मानायला हवे.

## वेस्टर्न रॅशनॉलिझम (भौतिक स्तर)

केशवचंद्र सेन, राजा राममोहन रॉय - ब्राम्हो समाज ही संस्था व तिची चळवळ ही या लाटेची प्रतिक्रिया मानायला हवी. Rationalism, Reasons बुद्धि प्रामाण्यवाद, विवेक, तर्क प्रामाण्य, वैज्ञानिक दृष्टी यांचा आग्रह मानवी विचारधारेत असावा, असा आग्रह धरणारी ही संस्कृतीची लाट होती. त्या दृष्टीच्या ओघात व प्रकाशांत आपल्या धर्मसंस्था, रीतिरिवाज, श्रद्धा, जीवनशाखा, सांस्कृतिक व्यवहार, शिक्षणपद्धती, स्त्रीपुरुष संबंध व इतर अनेक व्यापार व श्रद्धा तपासल्या जाऊ लागल्या व पुष्कळ मोडतोड व जोड व सुधारणाही वेगाने होऊ लागल्या ही सत्य गोष्ट आहे.

## देशी अनुकरण

अगदी महाराष्ट्रातील कृष्णशास्त्री, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, म. फुले, न्यायमूर्ती रानडे व इतर यांच्या विचारांची उलाढाल या संदर्भातच तपासावीआणि जाणवावी लागेल. मग, नरेंद्र दत्त यांच्या ब्राम्होसमाजाच्या 'मेंबरशिपचा' संदर्भही या पार्श्वभूमीवरच बघावा लागेल.

त्यामुळे सती बंदी, विधवा विवाह, यज्ञातील बळी, अस्पृश्यता चळवळ, संतती नियमन वगैरे अनेक बदलाच्या मागे या सांस्कृतिक लाटेचे श्रेय योग्य मापाने द्यावेच लागेल !!

याच पद्धतीने युरोप, अमेरिका वगैरे देशातही या 'Human Consciousness' म्हणजे 'मानवी कॉन्शसनेस' मधील नवीन बदलामुळे अनेक परिणाम घडले. राजसत्तेचा पाडाव, फ्रेंच क्रांती व लोकशाही पद्धती, विज्ञान व गणित यांची प्रगती व प्रभाव, औद्योगिकक्रांती वगैरे बदल व सुधारणा आणि प्रगती, ही या धारेचाच प्रभाव होय.

### दोन डोळे

पण, या लाटेवर स्वार असलेला हा युवक, जेव्हा रामकृष्ण परमहंस सारख्या - 'कुठल्याही शाळेत न गेलेल्या' व ज्याला, ही बुद्धीवादी संस्कृती Mystic गूढवादी, या संज्ञेनेच फक्त जाणू शकत होती, त्या व्यक्तीच्या प्रभावाखाली का आला? प्रभावित का व कोणत्या पद्धतीने झाला ? त्याच्यात कोणती आत्मिक क्रांती झाली ? याचा आपण मागोवा घेणार आहोत.

एव्हढेच नव्हे तर अगोदर उल्लेखलेल्या संदर्भात 'रामकृष्ण-नरेन्द्र' हे स्पिरीच्युलिटी व रॅशनॉलिझम व रीझन ह्या दोन आत्मिक शैलींचा संवाद प्रतीकात्मक 'डेमो मॉडेल' याचेच रसायन होते. आणि तेही या जगात मानवी संस्कृती व कॉशसनेसच्या बदलाबद्दल उभारलेली एक प्रकारची गुढी-तोरण होते हेही आपल्याला मान्य करावे लागेल. आतापर्यंत 'रामकृष्ण-विवेकानंद' हा विषय केवळ भारतीय इतिहासाच्या एकांगी पार्श्वभूमीवर व थोड्याश्या न समजलेल्या अस्मितेवरच वपितला गेला असे मला वाटते.

एकतर Intellectualism (बुद्धिवाद) व Spirituality (अध्यात्मवाद) यामधील फरक ज्या बारकाईने व समज आणि जाणीवेने बघायला हवा तसे न होता - एखाद्या परदेशीय भौतिकवादी बुद्धिवंताच्याच कक्षेने व भूमिकेत तपासला गेला असे मला ठामपणे वाटते. याचे उघड कारण म्हणजे पारंपरिक धार्मिकतेमध्ये हा जो क्रांतिकारी बदल खऱ्याखुऱ्या स्पिरीच्युअल आगमनाने व अवताराने झाला त्याचे पुरेपूर आकलन 'स्पिरीच्युअल' पातळीवर झालेच नाहीत. असा 'प्रमाद' ज्ञानेश्वरांच्या 'कुंडलिनी योगा' च्या ज्ञानेश्वरीच्या ६व्या अध्यायावर व भगवद्गीतेच्या ११व्या अध्यायातील शक्तिपात व विश्वरुपदर्शनावरही आजतागायत होत आला आहे. हे असे कां झाले व होत आहे यांची कारणे शोधणे प्रस्तुत ठरावे नाही का?

### 'प्रचलित मानवी धर्म'

पण, त्या अगोदर, महायोगी अरविंद यांनी सांगितलेल्या मानवी कॉन्शसनेसची विशिष्ट पातळी किंवा स्तर व त्यांचा 'ॲव्हरेज' किंवा ' सरासरी ' पद्धतीचा प्रभाव एखाद्या मान्यता पावलेल्या 'जागतिक मानवी धर्मामार्फत - जागतिक सामाजिक मनावर कसा असतो, हे पाहूया. ते म्हणतात, प्रत्येक काळात वा युगात एका विशिष्ट मतप्रणालीचा प्रभाव राजकीय, तात्विक, सामाजिक, आर्थिक, मानसिक व एकंदर सगळ्या जीवनव्यवहारावर अंमल राखून असतो.तो सहज व सर्वसंमत असल्याने वेगळेपणाने जाणवत नाही . अरविंद- त्याला 'प्रचलित मानवी धर्म ' (The Religion of Humanity) असे म्हणतात. या संकल्पनेचा आपल्या हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन या धर्मांशी नव्हे तर एक प्रकारच्या सरासरी मानवी श्रद्धा व विश्वास त्या धर्मावर व तशा आचरणासंबंधी आहे. येथे 'धर्म' म्हणजे आचरणातला एखादा 'सोशल लॉ' असे मानावयाला हरकत नाही. हा 'धर्म' एखाद्या बुद्धीवादावर, भावना पद्धतीवर आदर्शावर आधारलेला असू शकेल.

त्यामुळे, नरेन्द्रच्या जन्माच्या वेळी आणि बऱ्याच प्रमाणात आजही हा धर्म एकाच जातीचा टिकून आहे. तो बुद्धिप्रामाण्यवादी, ऐहिकवादी, भौतिकवादी, चंगळवादी, भोगवादी असाच ब्रँड आहे. त्यात फार मूलगामी फरक

पडलेला नाही. जगातील बहुतेक राष्ट्रांना, समाजाला आज हा मान्य आहे. पण, तुलनेने या प्रचलित 'धर्मा' अगोदर कोणता 'मानवी धर्म' अस्तित्वात होता व जनमानस प्रभावित करीत होता? थोड्याशया फरकाने हा श्रध्दा, प्रचलित वेगवेगळे धर्म, मानवी कल्पना निर्मित नीतिमूल्ये, राजसंस्थेचा दैवी आधार (Monarchy, King is God) ईश्वरवादी, प्रेषक (जसे महंमद पैगंबर, जीझस ख्राइस्ट वगैरे) यांच्या आदर्श विचार व श्रद्धा यावर आधारलेला होता. दुसऱ्या बाजुला हा धर्म विज्ञान, गणित, यंत्रसंस्कृतीच्याही थोड्या प्रमाणात प्रगतिपथावर होता. हा 'मानवीधर्म' कोणत्याही 'ऋत' व 'सत्य' या वैदिक संकल्पनेसारखा Eternal सत्यावर व अपौरुषेय तत्त्वावर आधारलेला नव्हता, तर मानवी मनातून निर्माण झालेला म्हणजे 'मानवपुत्र' होता !!

नरेन्द्रचा धर्मही "Age of Reason" त्या संकल्पनेचाच होता व हे Reason मानवीच होते.

### दोन पातळीवर संवाद

मग थोडीशी छलांग मारून , उडी मारुन- असे म्हणावे लागेल की या तऱ्हेच्या बुद्धीवादाचा संसर्ग-संबध-संघर्षही नरेन्द्र या प्रतीकामार्फत रामकृष्ण परमहंस सारख्या 'स्पिरीच्यूअल' व्यक्तीशी आला ही नुसतीच मोठी घटना केवळ दोन व्यक्तींपुरती मर्यादित नसून ती एकंदरच दोन मानवी धर्मांच्या' संघर्षाची वा संवादाची होती. हा एक 'ऐतिहासिक टप्पा' होता. एव्हढेच नव्हे तर थोडेसे अतिक्रमण व 'अॅडव्हान्स आर्ग्यूमेंट' करून म्हणावेसे वाटते की मानवी कान्शसनेसमध्ये जी अपेक्षित प्रगती व्हावयाला हवी असा निसर्गाच्या व विश्वाचा हेतू व आपण मानत असल्यास, परमेश्वराचा हेतू होता, त्या संदर्भातच हा 'क्रिकेटचा खेळ' होता. यात गोलंदाज होते नरेन्द्र दत्त व फलंदाज होते 'रामकृष्ण' आणि पराभव झाला नरेन्द्रच्या बुद्धिवादाचा आणि विजय झाला खऱ्या सिपरीच्यूॲलिटीचा. हा संग्राम मग नंतर शिकागोला, अमेरिकेत व भारतातही 'स्वामी विवेकानंद' या फलंदाजामार्फत समाजात खेळला गेला व रंगला.

### काही वर्णने

आज आपण या ऐतिहासिक संवादातील दोन व्यक्तिरेखांचा परिचय त्यांच्या व्यक्तिगत वैशिष्ट्यापुरता करून घेऊया.

नरेन्द्र दत्त यांनी 'मार्शमन, एलफिस्टन' प्रभृति इतिहासकारांचे ग्रंथ वाचले होते. एफ्. ए. ला असतांना व्हिटले, जेव्हान्स, मिल प्रभृतींची तर्कशास्त्रावर जितकी इंग्रजी पुस्तके होती तितकी त्यांनी एकामागून एक आत्मसात करून घेतली होती. बी. ए.ला असताना इंग्लंडच्या व युरोपातील सर्व देशांच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचा व पाश्चात्य तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचा अभ्यास करण्याची त्यांना अतोनात इच्छा झाली होती. पाश्चात्य विज्ञानाचे आणि दर्शनशास्त्राचे (Philosophy) विशेष ज्ञान प्राप्त करून घेतले होते. डेकार्टेचा अहंवाद, ह्यूम व बेन्थॅम यांची नास्तिकता, स्पिनोझाचा 'अद्वैताचिद्वस्तुवाद' डार्विनचा अभिव्यक्तीवाद, कॉम्टे व स्पेन्सर यांचा अज्ञेयवाद इत्यादी दार्शनिकांच्या मतांचा सखोल अभ्यास करुन सत्य वस्तु काय आहे हे जाणून घेण्याचा प्रबल उत्साह त्यांच्या मनात उत्पन्न झाला. जर्मन दार्शनिकांची प्रशंसा ऐकून दर्शनेतिहास ग्रंथांच्या सहाय्याने कांट, फिक्टे, हेगेल, शोपेनहार आदि दार्शनिकांच्या मतांचे शक्य तेवढे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला होता. तसेच स्नायू आणि मेंदू यांची घडण कशी असते व त्यांचे कार्य कशा रीतीने चालते हे जाणून घेण्यासाठी ते आपल्या मित्रांबरोबर मधून मधून मेडिकल कॉलेज मध्ये जाऊन शरीर विज्ञानावरील व्याख्याने ऐकण्यात आणि या विषयावरील ग्रंथ वाचण्यात लक्ष घालीत होते.' नरेन्द्र अत्यंत तीक्ष्ण बुद्धी, अदृष्टपूर्व स्मरणशक्ती व सखोल विचारक्षमता घेऊन जन्माला आले होते. नरेन्द्र दत्त

ज्या ब्राह्मोसमाजाचे सभासद होते त्या संस्थेचे वैशिष्ट्य काय होते.

"Keshab Chandra Sen (1838-1884) was the ablest founder member of the Brahmo (Navavidhan) movement. He came under the spell of Christ, and pressed to have received the special favour of John the Baptist, Christ and St. Paul. He was entertained by Queen Victoria. Returning to India, he founded center of 'Brahmo Samaj' in various parts of the country. This movement took the form of unitarian Christianity, scoffed at Hindu Rituals, and preached crusade against image worship. Influenced by Western Culture, it declared the Supremacy of reason, advocated the ideals of the French Revolution....... it was an intellectual and eclectic religious ferment born of necessity of the time.

Unlike Hinduism, it was not founded on the deep inner experience of sages and prophets' (Gospel-Ram Krishna)."

हा तुटक उतारा अशासाठी दिला की नोन्द्र दत्त बुद्धीचा कोणता वारसा व प्रकार घेऊन रामकृष्णांच्या संदर्भात 'आकस्मिक व अचानक' येऊन पडले होते ते आकलन व्हावे. अगोदर ज्या सर्वसाधारण बुद्धीवादी प्रतिनिधीत्वाचा उल्लेख नोन्द दत्त यांच्याबाबत केला होता, तो या तपशीलवार माहितीवरून दृढ व्हावयाला हरकत नसावी.

युरोपियन संस्कृती मधील 'ख्रिश्चन धर्म' यापुरती धार्मिकता मान्य करुन, त्यावर युरोपियन तत्त्ववेत्ते (दार्शनिक नव्हे - वरील वर्णनात फक्त सारदानंदांच्या भाषांतरातील ती चूक आली आहे) यांनी बुद्धिवादात, जी काही प्रगती किंवा शुद्धता आणण्याचा प्रयत्न केला, तिचा स्वीकार करुन भारतीय विचारवंतांचा हा नवीन प्रातिनिधिक बुद्धिवादी वर्ग तयार झाला. नरेन्द्र दत्त हे माझ्या मते त्या वर्गाचे प्रतिनिधित्व करीत होते - फक्त रामकृष्णांची भेट होईपर्यंत.

## रामकृष्ण भिन्न व्यक्ती

मग, रामकृष्ण हे कोणते निराळे व मानवी कॉंशसनेसच्या संदर्भात नवीन तऱ्हेचे व्यक्तिमत्त्व होते, आणि त्यांचा जन्म काही विशिष्ट कामगिरी बद्दल झाला होता असे समजावयाला काही जागा आहे कां ? शिवाय, त्यांनी जो योग्य शिष्याचा शोध चालवला होता, त्या बद्दलच्या कथा यांना काही पृथ्वीवरच्या संदर्भात आपल्या मानवी समाजाला काही विशेष अर्थ होता काय, हे प्रश्न उपस्थित करावयालाच हवेत.

आता या प्रश्नांच्या उत्तरांकरिता 'रामकृष्ण लीला प्रसंग' यातील पुरावा ग्राह्य धरून कोणताही पाल्हाळ न लावता निष्कर्ष बघू या. ज्यांना आणखी थोडी सविस्तर चर्चा हवी असेल त्यांनी 'RamKrishna Prophet of New India - abridged from The Gospel of Sri Ram Krishna Swami, हे Nikhilananda (foreward by Aldus Huxley) (Harper Bros. Publishers, New York, London.) हे पुस्तक जरुर वाचावे.

आपल्याला आता ही पुस्तके, संदर्भ, चरित्र, कथा, अभिप्राय, टीका ग्रंथ या पलीकडे जाऊन काही मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत.

'स्पिरीच्यूऑलिटी' ही संकल्पना अजूनही समाजमानसात खऱ्या अर्थाने ज्ञात नाही. धर्म, सात्विकता, समाजसेवा, भूतदया, चमत्कार, अनाकलनीय वर्तन व चरित्र या पुसट पुसट व धूसर संकल्पनेत अडकली आहे . तसेच, या ऐतिहासिक संदर्भात ज्या घटना घडल्या, त्यामुळे आधुनिक विज्ञानाच्या ज्या मर्यादा उघड्या पडल्या त्याबद्दल समाजाला अजिबात जाणीव झालेली दिसत नाही. त्याचे आव्हान स्वीकारले जात नाही.

या लेखांत इतक्या अनेक संकल्पनाचा परामर्श घेणे अशक्यच असले तरी त्यांचा ओझरता उल्लेख सूत्ररूपाने करण्याचा माझा प्रयत्न रहाणार आहे.

मुख्य फरक जाणावयाचा आहे तो हा की सामान्य माणूस भौतिक जगाच्या दृष्टीने कितीही बुद्धिमान (..) झाला तरी त्याची त्याच्या स्वत:च्या मर्त्य अस्तित्वाबद्दल, निसर्गाच्या, विश्वाच्या उगमाबद्दल, व्यवहाराबद्दल त्याची अज्ञानीच भूमिका असते त्याची खंत आजच्या भौतिकवादी समाजव्यवस्थेला बिलकुल नाही आहे. उलट, रामकृष्णांसारख्या अवतारी पुरुषाला या पृथ्वीवरील जीवनाचा एका विहंगम, त्रयस्थ भूमिकेतून व इंद्रियेतर जाणीवशक्तीच्या जोरावर एक वास्तव व ज्ञानी भूमिका प्राप्त झालेली असते. इथे बुद्धीच्या प्रांतात फक्त ऐहिक, पृथ्वीवरच्या किंवा जड वस्तूंच्या अर्धवट ज्ञानापलीकडे काही ज्ञान असते, याचा मागमूस किंवा विश्वास नसतो. फिकीरही नसते. खरोखर ही आश्चर्याची गोष्ट आहे पण दुर्दैवाने खरी आहे !!

तेव्हा रामकृष्णांना त्यांचा जन्म होण्यापूर्वी असलेल्या त्यांच्या पृथ्वीवरच्या कार्यांची व 'नरेन्द्र दत्त'या जीवाच्या मार्फत (व इतर साधकभक्तांमार्फत) जे कार्य पृथ्वीवर करावयाचे याची जाणीव होती. यावर विश्वास नसेल तर या कथा अविश्वासार्ह मानून पुढचा प्रवास होईल. जवळजवळ आजही आपल्या जगाचा प्रवास, - अश्रद्ध व श्रद्ध या दोन्ही जीवांचा प्रवास, याच 'अविश्वासावर' चालला आहे असेच दिसते.

## पुनर्जन्म व आत्म्यांचा प्रवास

सध्या, आपल्याला या चर्चेत जावयावयाचे नाही. पण, जर विश्वास बसत असेल तर मग पुढील काही घटना मान्य कराव्या लागतील व त्यातील वैश्विक नियमांचा (Eternal Law) व नैतिकतेचा (Cosmic Morality) व प्रगतीच्या आराखड्याचा परिचय (Cosmic Plan of Progress) व शोध घ्यावाच लागेल.

प्रथम, म्हणजे जीवाच्या पुनर्जन्माचा व सर्वसाधारण पूर्व जन्माच्या व पुढील मृत्यूनंतरच्या पुनर्जन्माच्या विस्मृतीचा। जन्ममृत्यूचे रहाटगाडगे हे केवळ 'लीलाच' (अर्थशून्य खेळ) आहेत, की त्यात काही 'वैश्विक हेतू व उद्देश' आहे ? सामाजिक सर्वसाधारण जैविक जाणीवेच्या संदर्भात या जीवव्यापाराने काही नवीन भर पडते का व त्यात 'अवतार' घेणाऱ्या जीवांच्या मार्फत कोणत्या प्रकारचे कार्य होते. कसे होते. त्यात निसर्गाचा काय हातभार लागतो ?

## प्रगती कोणती ?

सर्वसाधारणपणे सामाजिक प्रगती फक्त राजकीय, आर्थिक व भौतिकच असते असा समज असतो. त्याला हा प्रश्न गैरही वाटणे संभव आहे व तिथेच 'ऐहिक जीवांचे अज्ञान दिसते.' 'बुद्धीवानही' या अज्ञानाचे 'गिऱ्हाईक' असतात, ही वस्तुस्थिती आहे. आजची सगळी 'सोशल सायन्सेस' या अज्ञानाची गिऱ्हाईके किंवा बळी आहेत.

## शक्तिपात व अतिंद्रिय दृष्टी

'नरेन्द्र दत्त' यांची रामकृष्णाची भेट व त्याला रामकृष्णांच्या मार्फत होणारा 'शक्तिपात' आणि त्यानंतरचे 'स्वामी विवेकानंद' या नावाने झालेले कार्य हे या संदर्भात जाणले पाहिजे. नाहीतर, फक्त मनोरंजक, अविश्वार्ह, अद्भुत कथा, या भूतलावर झाली, या 'भक्तीभावापुढे' कोणतीही 'प्रगती' होणार नाही. इथे 'शक्तिपात' म्हणजे काय व त्याची आवश्यकता काय असा नैसर्गिक प्रश्न पडावयाला हवा. पण, तसा तो गंभीरपणे पडत नाही हे सत्य आहे. आजच्या मानवी बुद्धीतील पलायनवादाचेही हे एक लक्षण आहे. ज्ञानेश्वरीची अनेक पारायणे करणारे या 'शक्तिपाता बद्दल' काय 'जिज्ञासा' दाखवतात असा प्रश्न स्वाभाविकपणे पडावयाला हवा की नको ? भगवद्गीता समजण्याकरिता ज्ञानेश्वरी जाणण्यासाठी 'शक्तिपाता'ची आवश्यकता आहे असे संत ज्ञानेश्वर सांगत असूनही त्याकडे सोयिस्कर दुर्लक्ष का होते आहे?

### पुन्हा रामकृष्ण त्यांची साधना

प्रथम, आपण रामकृष्ण यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे वळू या. गदाधर हे त्यांचे मूळ नाव त्यांचे वडील खुदीराम व आई चंद्रादेवी यांना 'गयेला' स्वप्नांत 'विष्णू' देवांनी दिलेल्या आश्वासनावर त्यांचे इहलोकी पृथ्वीवर आगमन आधारलेले आहे. प्रत्यक्ष विष्णू हे 'मुलगा' म्हणून त्यांच्या पोटी जन्म घेतील, असे ते स्वप्न होते. १८ फेब्रुवारी १८३६ ला हा जन्म झाला. ६व्या वर्षीच गदाधरला 'स्पिरीच्यूअल अनुभूतीचा' स्पर्श झाला. ब्राह्मणाच्या घरी जन्म घेऊनही शूद्र नोकराणीकडून तिने शिजवलेले जेवण त्याने स्वीकारले. रघुवीर या कुलदैवताची साधन व ध्यान तो करू लागला. या सुमारास एका नाटकात शिव शंकराचे काम करताना देहभान विसरून त्यांच्या अंगात शिव शंकर संचारला व मूर्छा येऊन नाटक बंद पडले. मोठ्या भावाने अभ्यासात गदाधरने 'लक्ष घालावे' असा आग्रह धरल्यावर, गदाधराचे उत्तर फार मार्मिक आहे. 'बंधुराज, नुसते चरितार्थाला उपयोगी पडणारे शिक्षण घेऊन मी काय करु ? त्या ऐवजी माझ्या हृदयात ज्ञानाचा प्रकाश पडेल व कायम स्वरुपाचे समाधान प्राप्त होईल असेच ज्ञान मी मिळवू इच्छितो'.

१८४७ च्या सुमारास राणी रासमणी या एका शूद्र जातीच्या पण श्रीमंत विधवेने, आपल्या दक्षिणेश्वर या गावच्या २० एकर जागेवर तिच्या इष्ट देवतेचे म्हणजे कालीमातेचे मंदिर बांधले. गदाधरची नियुक्ती या मंदिरात पूजा अर्चा करणारा ब्राह्मण व रामकृष्ण या नावाने झाली.

त्यानंतरच्या काळात अनेक व्यक्तींच्या संसर्गात येऊन, साधुसंत, तांत्रिक, भैरवी स्त्री वगैरेंच्या सहवासात व मार्गदर्शनात रामकृष्णाला विलक्षण स्पिरीच्यूअल शिक्षण मिळाले. त्याचे सविस्तर वर्णन येथे करणार नाही. पण, एवढेच म्हणेन की ऐहिक जीवनात देहाच्या खऱ्या स्वरुपात स्वत:च्या अस्तित्वाने जे दर्शन दुर्लभ असते व जे वैश्विक अस्तित्वाचे स्वत:चे भान सहजासहजी येत नाही, त्याचा दैवी लाभ रामकृष्णांना, या काळात झपाट्याने झाला. पूर्वजन्मीची स्मृतिही लाभली. व्यक्त आणि अव्यक्त जगात सुलभपणे ये जा करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले.

पुढच्या आयुष्यातील अनेकदा समाधीचे भान हरपण्याचे, दुसऱ्या व्यक्तीला शक्तिपात क्रियेने स्पिरीच्यूअल ज्ञान (त्या अवस्थेपुरते) अनुभूतीचे देण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले, त्याचा जागोजागी प्रत्यय येतो.

### स्पिरीच्युअल संघर्ष

एवढे वर्णन पुरे आहे. नरेन्द्र दत्त या केवळ भौतिक जाणीवेमधील बुद्धिवाद्याचे व्यक्तिमत्त्व व रामकृष्ण या पूर्णावस्थेत गेलेल्या परमहंस या आध्यात्मिक अधिकारी व्यक्तिमत्त्वाचे अनेक प्रसंग प्रसंगातून होणारे अलौकिक दर्शन हा नरेन्द्र दत्त याच्या चरित्राचा मुख्य भाग आहे. त्यातील फक्त 'भौतिक व्यवहाराचेच' आकलन आतापर्यंत भरपूर प्रमाणात झाले आहे. पण, त्यातील स्पिरीच्यूअल संस्काराचे व ज्ञानाचे दर्शन त्यांतील रहस्याचा किंवा एरव्ही अनाकलनीय तांत्रिक व्यवहाराच्या भागांचे दर्शन फारसे घडलेले दिसत नाही वा सांगितले जात नाही ही शोकांतिका आहे.

हा सर्व 'चरित्राचा पसारा' एखाद्या 'शॅडो प्ले' म्हणजे सावल्यांच्या स्वरूपाचा आहे. प्रत्यक्ष या नाटकाच्या नायकाच्या चैतन्य मूर्तीचा अनुभूतींचा वा जाणीवांचा लाभ व्हायचाला हवा तो लाभ नाही. हे दर्शन एक प्रकारे चंद्राच्या पृथ्वीकडे तोंड असणाऱ्या भागाचे आहे. विश्वाच्या चैतन्यसूर्याच्या मुखाकडे पाहणाऱ्या भागाकडचे नाही हे निर्विवाद आहे. तेव्हा हे माया दर्शन आहे, सत्य आणि ऋतचे नाही. याचे कारण उघड आहे. जसे त्रिमिती (३डी) सिनेमा पाहण्यासाठी तो विशिष्ट स्टिरीओस्कोपी चष्मा लावावा लागतो, नाहीतर फक्त गोंधळणारे दोन मितीतले पसरट दर्शनच दिसते. तसेच काहीसे येथेही - जो समाज केवळ भौतिकच पातळीवर, ऐहिक बुद्धिभावाने, इंद्रिय

गोचर, अहंकारी वृत्तीने व बंदिस्त व भौतिक शृंखलाबद्धतेने, थोड्याशा संशयी वृत्तीने व एखाद्या 'डॉग्मा' किंवा संप्रदायाचा गॉगल लावून हे चरित्र प्रसंग बघतो, त्याला हा अलौकिक पण वैश्विक सत्याने ओथंबलेला 'व्यवहार' समजणारच नाही - दिसणारच नाही- भावणारच नाही !!

मग, असे कोणते प्रसंग आहेत या चरित्रात? खरोखरी सर्व बघावयाला हवेत पण आपण नमुन्यादाखल चर्चेपुरता एखाद्या महत्वाचा प्रातिनिधिक प्रसंग तपासू या.

### चरित्र प्रसंग

अनेक प्रसंगात रामकृष्ण त्यांच्या कालीमातेच्या (साक्षात्कारी) भाष्याचा उल्लेख सत्याच्या पुराव्यादाखल सांगत असत. विशेषत: नरेन्द्राच्या (विवेकानंद) शोधप्रश्नावर किंवा विरोधी तर्क विचारावरही स्वामी सारदानंद काय वर्णन करतात ते पाहू, 'आईने दाखवले आहे, ती बोलवीत आहे' असे म्हटल्यानेच ठाकुरांची असल्या प्रसंगी नरेन्द्राच्या हातनू सुटका होत असे, असे नव्हे. त्यांच्या असल्या दर्शनांच्या खरेपणाविषयी संदेह वाटून स्पष्टवक्ते, निर्भय नरेन्द्र पुष्कळदा म्हणत असत -

'आईने दाखविले आहे की, हे सगळे तुमच्याच मनाचे चाळे आहेत हे कोण सांगू शकेल? मला जर असे झाले असते, तर मी नक्कीच समजलो असतो की हे सारे माझ्या मनाचे चाळे आहेत. पाश्चिमात्य विज्ञानाने व तत्वज्ञानाने हे नि:संदेहपणे सिद्ध केले आहे की, डोळे, कान वगैरे इंद्रिये आपल्याला अनेकदा फसवीत असतात. त्यातही आपल्याला विशिष्ट दर्शने व्हावीत, अशी इच्छा आपल्या मनात सारखी वसत राहिली तर मग बोलायलाच नको; मग ती (इंद्रिये) आपल्याला पदोपदी फसवीत रहातात. तुमचे माझ्यावर प्रेम आहे म्हणून कदाचित् तुम्हाला ही सारी दर्शने होत असावीत, असे म्हणून श्रीयुत नरेन्द्र पाश्चात्य शरीरविज्ञानात (Physiology) स्वसंवेद्य म्हणजेच व्यक्तिनिष्ठ, दर्शनासंबंधी जे संशोधन झाले आहे व शोध लागले आहेत आणि ज्याप्रकारे ही सारी दर्शने भ्रमात्मक ठरली आहेत, ते सगळे नाना उदाहरणांच्या मदतीने ठाकुरांना समजावून सांगण्यास कधी कधी प्रवृत्त होत असत.

ठाकुरांचे मन ज्यावेळी उच्चभावभूमींवर अवस्थित असे, त्यावेळी नरेन्द्राच्या असल्या बालसुलभ प्रयत्नाला केवळ त्यांच्या सत्यनिष्ठेचे गमक मानून ते त्यांच्यावर आणखीच प्रसन्न होत असत. परंतु साधारण भावभूमींवर अवस्थान करतेवेळी नरेन्द्राचे तीक्ष्ण मुद्दे ठाकुरांच्या बालकासारख्या स्वभावाच्या सरळ मनाला घोटाळ्यात टाकून कधी कधी त्यांना भलतेच चिंताक्रांत करून टाकीत असत - ''तेच तर कायावाचा मनाने सत्यपरायण असलेला नरेन्द्र खोटं बोलणारा माणूस नव्हे. त्याच्यासारख्या दृढ सत्यनिष्ठ व्यक्तींच्या मनात सत्याखेरीज वेगळा संकल्प उदय पावत नसतो, असे शास्त्रातही सांगितलेले आहे. तर मग काय माझ्या माझ्या दर्शनामध्ये भ्रांतीची शक्यता आहे?

परत विचार करीत - 'पण, मी तर यापूर्वी नानाप्रकारे परीक्षा करून बघितले आहे की, आईने (श्रीजगदंबेने) मला नेहमी खरेच दाखविले आहे. खोटे कधीच नाही आणि तिच्या श्रीमुखाने मला वारंवार दिलासाही मिळालेला आहे. मग, सत्याला प्राच्य मानणारा नरेन्द्र माझी दर्शने मनाचे चाळे आहेत असे का म्हणतो? का बरे त्यालाही दर्शने सांगितल्याबरोबर ती सारी खरी असल्याचा प्रत्यय येत नाही?'

अशाप्रकारे काळजीत पडून तिच्या निरसनासाठी ठाकूर अखेर श्रीजगदंबेला ही गोष्ट विचारीत आणि ''त्यांचे (नरेन्द्राचे) म्हणणे ऐकतोस कशाला? काही दिवसांनी तो (नरेन्द्र) या साऱ्या गोष्टी खऱ्या मानील.' असे आश्वासन शब्द तिच्या श्रीमुखांतून ऐकून मग कुठे ते निश्चिंत होऊ शकत.'

हा उतारा सविस्तरपणे देण्याचा उद्देश हा आहे की त्यातील काही विधानामागे कोणते 'आध्यात्मिक सत्य'

या 'स्पिरीच्यूअल रहस्य' दडले आहे त्याचा अभ्यास करता येईल.

### तांत्रिक सिद्धी व भक्तीपंथ

रामकृष्णांची ही दर्शने कोणत्या पद्धतीची असावीत व त्यात त्यांचा अधिकार वा पात्रता कोणती होती? एकतर त्यांचे पूर्व जन्मींचे सुकृत व संस्कार. त्याचे दर्शन त्यांच्या ध्यान, धारणा, समाधीच्या सहज प्रवृत्तीमध्ये सापडते.

रामकृष्णांचा जन्म १८३६ साली झाला. १८६१ च्या सुमारास म्हणजे त्यांच्या २५ व्या वर्षी त्यांना ब्राह्मणी नावाच्या ५० वर्षीय ब्राह्मण स्त्रीने तंत्र व वैष्णवपंथाच्या दीक्षा दिल्या. रामकृष्णांनी जेव्हा त्यांना होणारे विचित्र अनुभव व दृश्य याबद्दल शंका विचारल्या त्यावेळी तिने त्यांना खात्री पटवून दिली की ही काही वेडाची लक्षणे नसून 'शास्त्रात सांगितलेली १९ शारिरीक लक्षणांपैकी काही आहेत. अश्रु येणे, शरीराला कंप होणे, घाम फुटणे, जळजळ होणे वगैरे; आणि याचाच अर्थ हा की अत्यंत दुर्लभ व अवतारी पुरुषांनाच होणाऱ्या 'महाभाव' अवस्थेतून त्यांचा प्रवास सुरू झाला आहे. याची खात्री करण्याकरिता वैष्णव चरण (वैष्णव सोसायटीचे अधिकारी) व पंडित गौरी यांना पाचारण करून त्यांना रामकृष्णांची परीक्षा करावयाला सांगितले. दोघांनी रामकृष्ण हे एक स्पिरीच्यूअल व्यक्ती व विलक्षण अधिकाराची आहे, यावर शिक्कामोर्तब केले व ते एक अवतारी पुरुष आहेत. वेडा पुजारी नव्हे, असे जाहीर केले.

शिवाय त्यांना होणारे दृष्टांत हे काही भरकटलेल्या मेंदूचे प्रताप नसून त्यांना स्पिरीच्यूअल (आध्यात्मिक) शास्त्रांत इतिहास व आधार आहे. ब्राह्मणी या त्यांच्या गुरुस्त्रीने तर रामकृष्णांना दुसऱ्या व्यक्तीला 'शक्तीपात' मार्गाने अध्यात्मविद्येत शक्ती जागृत करण्याचीही शक्ती आहे असे जाहीर केले. रामकृष्णाने नंतर मधुराभक्ती, अद्वैत तत्वज्ञान तोतापुरीमार्फत व इतर धर्मातील स्पिरीच्यूअल अनुभव घेऊन स्वत:ची काही भूमिका निश्चित केली, तिचा उल्लेख करणे इथे आवश्यक ठरावे.

### रामकृष्णांचे 'मायाचे' तत्त्वज्ञान

भौतिक जगात माया ही ईश्वरी शक्तीच आहे आणि तिचा अधिक्षेप किंवा त्याग करण्यापेक्षा तिचे सामर्थ्य व मर्यादा ओळखून उपयोग करावयाला हवा.

'अविद्यामाया' म्हणजे विश्वनिर्मितीतील 'तामसी व जड शक्ती' होत, भोगवृत्ती, पाशवी इच्छा, लोभ, वासना, क्रौर्य वगैरे. पण यावरच या जगाची खालची पातळी आपले अस्तित्व सांभाळते. जन्म मृत्यूचे फेरे याला हीच जबाबदार आहे. तिच्याशी संग्राम करणे व विजय मिळविणे आवश्यक असते.

उलट 'विद्यामाया' ही सृष्टी किंवा विश्वनिर्मितीतील 'उच्च शक्ती' होय. आध्यात्मिक नैतिकता व गुण दया, क्षमा, शांति, प्रेम, भक्ती हे तिचे काही गुण.

या दोन शक्ती कालीमातेची - विद्यामाया ही मनुष्याला उच्च कॉशसनेसच्या पातळीवर नेऊ शकते आणि खरी मुक्ति मिळू शकते.

### साक्षात्कारी आदेश

रामकृष्णांना पुढे साक्षात्कार झाला की तंत्रात सांगितलेल्या ६ व्या चक्रावरच त्यांनी अस्तित्व ठेवावे तेथून ७ व्या चक्रावरील दिव्यजग दिसेलच व खालच्या पातळीवरची कुंडलिनी शक्ती व तिचा संचारही दिसू शकेल. सहजसुलभतेने त्यांचा या सीमारेषेच्या दोन्ही बाजूंना संचार होऊ शकेल. रामकृष्ण त्यामुळे व्यक्त, अव्यक्त, इंद्रियातीत, अवस्थात्रयातीत, गुणत्रयातीत अशा अतींद्रिय वैश्विक अस्तित्वाचाही अनुभव करू शकत होते. स्पिरीच्यूअल इतिहासात हा अधिकार आधुनिक काळात प्रथमच प्राप्त झालेला दिसला, असे म्हणावयास हवे.

रामकृष्णांची ही स्पिरीच्यूअल शक्तीची शिकवण

किंवा पुन:स्मृति व प्राप्ती या सुमारास म्हणजे १८७५ पर्यंत पुष्कळ प्रमाणात पूर्ण झाली, असे मानावयास हरकत नाही.

### रामकृष्णांचा अधिकार

१८७७ च्या सुमारास रामकृष्णांचा केशवचंद्र सेन यांच्याशी संबंध आला आणि १८८० मध्ये राखाल व नरेन्द्रनाथ दत्त (विवेकानंद) यांची भेट झाली.

या गोष्टीचे महत्व असे आहे की, रामकृष्णांना ज्या स्पिरीच्यूअल कार्यांच्या प्रेरणा झाल्या व त्यांना 'नरेन्द्र दत्त' यांच्या जन्माबद्दलचे व त्याच्या भविष्यातील ऐहिक कार्यांचे दर्शन 'साक्षात्कारी पद्धतीने' झाले त्याला कोणता आधार वा अधिकार होता ते स्पष्ट व्हावे.

### घटनांचा अर्थ

आता आपण अगोदर उल्लेखलेल्या नरेन्द्र दत्त यांच्या सविस्तर वर्णनाकडे परत वळूया.

नरेन्द्र दत्त यांच्या त्यावेळच्या भूमिकेतून रामकृष्णांचे कालीमातेचे दृष्टांत हे एक तऱ्हेचे मानसिक भ्रम होते. का बरे? कारण, त्याचा विश्वास पाश्चात्य विज्ञानाच्या तत्वज्ञानावर होता.

स्वामी निर्वेदानंद म्हणतात -

'Narendranath, when he met Ramkrishna for the first time, represented the searching, analytical, rationalistic, truth seeking, Vigorous Spirit of the Modern West. He was a votary of reason and had absolutely no faith in church dogmas, sentimental effusions and apparently meaningless ceremonials. He could not regard ecstatic vision as anything more than hallucination. He was undoubtedly, a seeker of Reality; but even in the spirit and technique of his search, he resembled more a scientist or philosopher of the Western World than a spiritual aspirant of the Indian type."

पण, नरेन्द्र दत्त यांच्या रामकृष्णांच्या तिसऱ्या भेटीच्या वेळी (त्यांच्या उद्गारातलेच वर्णन बघुया) 'जेव्हा रामकृष्णांनी एकाएकी जवळ येऊन आपला उजवा पाय माझ्या अंगावर ठेवला आणि त्याच्या स्पर्शाने क्षणभरात मला एक अपूर्व अनुभूती प्राप्त झाली.'

पुढे ते म्हणतात, 'हे सारे तुम्हाला सांगावयाला वेळ लागला तरी ही घटना अगदी थोड्या वेळात होऊन गेली आणि तिच्यामुळे माझ्या मनात एक युगांतर घडून आले. दिङ्मूढ होऊन विचार करू लागलो की हे काय झाले? हे तर प्रत्यक्षच बघितले की ते या अद्भूत पुरुषाच्या प्रभावाने एकाएकी उद्भूत होऊन (विश्व) एकाएकी लय पावले.

ग्रंथांमध्ये mesmerism विषयी (विशेष सामर्थ्याने दुसऱ्याला गुंगी आणण्याविषयी व hypnotism विषयी (संमोहनविद्येविषयी) वाचले होते. विचार करू लागलो की हे काय तसलेच काही आहे ? परंतु या विचाराला अंत:करण साथ देईना. कारण दुर्बळ मनावरच प्रभाव पाडून प्रबळ इच्छाशक्ती असलेल्या व्यक्ती या साऱ्या अवस्था निर्माण करीत असतात; परंतु मी तर तसा नाही, उलट इतके दिवस मी विशेष बुद्धिमान व मानसिक बलसंपन्न आहे, असा अहंकार बाळगीत आलो आहे.

असामान्य गुणशाली व्यक्तीच्या सान्निध्यात सर्वसाधारण माणसे जशी मोहित होतात आणि तिच्या हातचे बाहुले बनून जातात, तसा तर मी यांना बघून झालेला नाही; उलट मी यांना अर्धवेडा ठरविले आहे. मग माझे एकाएकी असे होण्याचे कारण काय? विचार करून पाहिला, पण नक्की ठरवू शकलो नाही; अंतकरणात एक भयंकर गोंधळ माजून राहिला. महाकवीचे शब्द आठवले - 'पृथ्वीवर व स्वर्गात अशा अनेक गोष्टी आहेत की, मानवी बुद्धीचे रचलेले तत्वज्ञान स्वप्नातही त्याचे रहस्य उलगडणार नाही.' मनात आले की हेही तसेच आहे. विचार करून ठरविले की याचे रहस्य कळू शकायचे नाही म्हणून पक्का निश्चय केला की, हा अद्भुत वेडा आपला प्रभाव पाडून जेणेकरून

पुढे आणखी कधीही माझ्या मनावर अधिकार गाजवून माझे असे भावांतर करूं शकणार नाही, याविषयी सावध रहावयाचे.

'परत विचार करूं लागलो की नुसत्या इच्छेने हा मनुष्य जर माझ्या मनासारख्या प्रबल इच्छाशक्तीसंपन्न मनाची दृढ संस्कारमय घडण अशा रीतीने तोडून-फोडून चिखलाच्या गोळ्यासारखा त्याला आपल्या घाटाचा आकार देतो तर याला वेडा तरी कसे म्हणू?...

अशा या माणसासंबंधीही काहीतरी स्थिर निर्णय करूं शकलो नाही. बुद्धीचा उन्मेष झाल्यापासून व निरीक्षण परीक्षण व तर्क-अनुमान यांच्या मदतीने प्रत्येक वस्तू व व्यक्ती यासंबंधी एक निश्चित मत बनविल्याखेरीज मला कधीही स्वस्थ वाटू शकत नाही; आज माझ्या त्या स्वभावावर भयंकर आघात होऊन अंत:करणात एक वेदना उद्भवली. परिणामी, मनात फिरून असा प्रबळ संकल्प उदय पावला की, कसेही करून या अद्भुत माणसाचा स्वभाव व शक्ती यथातथ्यपणे समजून घ्यायचीच घ्यायची.'

हे वर्णन सविस्तरपणे देण्याचे प्रयोजन हेच की, एका बाजूला, एक स्पिरीच्युअल सामर्थ्याची व्यक्ती पण अनपढ (लौकिक अर्थाने) व दुसऱ्या बाजूला एक दुसरी व्यक्ती की जी प्रचलित समाजातील उच्चशिक्षित, बुद्धीवादी व एक तल्लख स्वतंत्र बुद्धी पण तरीही भौतिकवादी व विज्ञानवादी, यांच्यामधला हा झालेला 'शक्तिपात व्यवहार' व त्यावरची भौतिक मनाची झालेली आंदोलने असे वर्णन क्वचितच वाचावयाला मिळावयाचे म्हणून ते महत्त्वाचे !!

### आपली असहिष्णुता

शिवाय हा प्रसंग केवळ २०० वर्षापूर्वीचा तेव्हा बिलकूल ताजा आणि त्याच्या सत्याची शहानिशा करण्याइतका पुरावा उपलब्ध. दोन्ही व्यक्ती प्रसिद्ध व धर्मसंकल्पनेत क्रांती घडवणाऱ्या. दुर्दैव असे आहे की, अजूनही याकडे 'कथेच्याच भूमिकेतून पाहिले जाते. 'शक्तिपात' त्या विषयावर आजही 'अधिकारी' व्यक्ती आपल्यात आहेत. भगवान कृष्ण, ज्ञानेश्वर, विष्णुतीर्थ महाराज, गुळवणी महाराज, काश्मीरी योगी, कै. गोपीकृष्ण यांची अनेक भाष्ये उपलब्ध आहेत. त्यांनी स्थापलेली 'कुंडलिनी रिसर्च इन्स्टिट्युट' ही आजही न्यूयॉर्कला संशोधन करत आहे.

### राजकीय फसवणूक

'अतींद्रिय ज्ञानाचा' हा अनुभूती व ज्ञान संक्रमणाचा 'भारतीय प्रकार' याला समाजमान्यता, राजमान्यता व विज्ञानमान्यता बिलकूल नाही. याचा एक उघड अर्थ हा की ज्ञानाचा व्यवहार या जगात एका सांप्रदायिक (भौतिक विज्ञानवादी) पूर्वग्रही पद्धतीनेच होत आहे. त्याचे प्रणालीबाहेर सत्यशोधनाशी वावडे आहे. आपलाच शब्द व पद्धती तिला प्रिय आहे.

### राजकीय क्षेत्रांतही हाच प्रकार !

कॉ. नारायण देसाई यांनी २१ व्या शतकातले विवेकानंद हे पुस्तक लोकवाङ्मय प्रकाशन गृहातर्फे छापले. पण, त्यातही विवेकानंदांबद्दल गौरव उद्गार या एका थोर कम्युनिस्ट पुढाऱ्याने काढले, म्हणून (एकीकडे) त्यांच्या औदार्याचे कौतुक पण, ज्या तांत्रिक क्रियेने नरेन्द्र दत्त यांच्या शक्तिपात क्रियेने कॉशसनेसमध्ये आमूलाग्र बदल झाला त्याबद्दल उल्लेख नाही. याबद्दल प्रचंड खंत हा पलायनवादच म्हणावयाला हवा किंवा आत्यंतिक पूर्वग्रह कलुषितपणाचेच लक्षण होय. या घटनेवर विरोधीसुद्धा भाष्य नाही, असे का व्हावे?

पण या 'सामाजिक कटाचा' परिणाम समाजाला, विशेषत: भारतीयांना त्यांच्या खऱ्या विलक्षण सामर्थ्यशाली ज्ञानशास्त्रापासून (Epistemology) अंधारात ठेवण्यात व वंचित करण्यात होतो आहे. Vedic Epistemology असा काही विषय आहे, याची दखल समाज घेत नाही आहे.

### वास्तववादी निष्कर्ष

या ऐतिहासिक घटनेचे वर्णन काही मोठ्या व्यक्तींनी मात्र कसे केले आहे हे वाचण्यासारखेच आहे.

To quote Romain Rolland

"He (Naren) was struck by the incomprehensive power of Ramkrishna. It attracted him, as a magnet attracts iron, but he himself was made of stern metal. His reason would not submit to domination... He was resolved to maintain his independence, and to accept nothing from the Master except what could be rigorously controlled by his reason. The uncritical faith of the others roused his contempt."

Yet Naren did ultimately surrender to Ramkrishna. And, it was highly significant. "Sri Aurobindo had occassion to remark, "The Capitulation of Vivekananda to Ramkrishna is a capitulation of the West to East."

स्वामी निर्वेदानंद म्हणतात :

"By closer observation he (Naren) found that in Ramkrishna's attitude as a spiritual teacher there was nothing that might shock his own passionate loyalty to reason. The Sage was perfectly rational in his method of approach towards his spiritual pupils and in presenting before them his own knowledge."

ज्या वेस्टर्न संस्कृतीचा, विज्ञानाचा नरेन्द्र दत्त यांच्यावर तेव्हा अंमल होता, त्याच क्षेत्रात व समाजात आता विचारवंत काय म्हणतात ते बघूया.

### आधुनिक विज्ञानाचे अंधत्व

जॉर्ज इलियट या लेखिका म्हणाल्या होत्या की, 'सायन्सचा खरा हेतू शोध घेणे व उत्तर शोधणे हा असूनही गूढ अध्यात्माशी संबंध आला की त्याचे शत्रुत्व जागे होते. (Science, whose soul is explanation, halts with hostile front when faced with Mystery.")

योगी गोपीकृष्ण ज्यांनी 'कुंडलिनी रिसर्च सेंटर' न्यूयॉर्कला स्थापन केले, त्याचे उद्गार जास्त स्पष्ट आहेत.

"The arousal of Kundalini leads to certain biological changes in the system and ultimately to the manifestation of a higher consciousness, which we call mystical consciousness or enlightenment. Psychology summarily rejects enlightenment as something divine and instead ascribes it to the subconsious.

How can we bring conviction to the world that there is a divine ruler of the universe, that human life is programmed, that there is a target for human beings to achieve, and above all, that human life has a purpose and a plan?

### जाणीवपूर्वक दुर्लक्ष

अजूनही भौतिकवादी, विज्ञानवादी, राजकारणी, समाजवादी मंडळी ज्ञानाच्या, प्रगतीच्या व धर्माच्या व नैतिकतेच्या या प्रयत्नांकडे पूर्वग्रही दृष्टीने व अविश्वासाने पहात आहेत आणि 'मूर्खासारखा' विरोध करत आहेत आणि सत्य गोष्टींपासून समाजाला वंचित ठेवीत आहेत व त्याबद्दल पूर्वग्रह प्रचलित शिक्षणपद्धतीत बांधत आहेत. ही बांधणी हेतुपुरस्सर आहे ! कारण वारंवार या आत्मनिष्ठ ज्ञानाचा प्रयोग योगी व संतांकडून होऊनही त्याकडे गटबाजीने व शैक्षणिक आर्थिक व राजकीय अधिकाराचा दुरुपयोग करून आपल्या दूषित बुद्धी व प्रवृत्तींच्या खेळासाठी सामाजिक व नैसर्गिक संपत्तीचा गैरवापर करत आहेत. ज्या मानसिक क्रांतीचा विवेकानंदांनी शिकागोसारख्या वेस्टर्न जगाच्या शहरात उद्घोष केला, त्यांच्या खऱ्या अर्थाकडे, योग्यतेकडे व सामर्थ्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष आजतागायत करत आहेत.

कारण नरेन्द्र दत्तच्या वैज्ञानिक व भौतिकवादी (मायावादी) प्रवृत्तीत व मानसिकतेत रामकृष्णांनी जो बदल

घडवून आला, त्या कारणाने 'विवेकानंद' या बदललेल्या व्यक्तिमत्वातून व नैतिक प्रवृत्तीतून, त्यांना निरनिराळ्या धर्मातील खोटे वितंडवाद, संघर्ष, खऱ्या स्पिरीच्यूअॅलिटीचा अभाव व छुपलेली भौतिकताच दिसली व ती त्यांनी मांडली आणि 'पॉझिटिव्ह' - सकारात्मक पद्धतीने !! तसेच खुद्द भारतातही हिंदु धर्माची जी खऱ्या वेदिक व सनातन धर्मापासून तफावत किंवा फारकत झाली होती, त्याबद्दल त्यांनी घोषणा केली की,

'Reform Hinduism to Vedic Purity'

हे धर्मग्लानी घालवण्याचे युगप्रवर्तक कार्य होते. संन्यासमार्गी अद्वैत तत्वज्ञानी व वेदिकसंहितेच्या विद्वानांचीसुद्धा जी समाजाबद्दल असहिष्णु, बेफिकीर किंवा संन्यस्त वृत्ती की जी चूकीची होती ती हिंदू धर्माचा खरा अर्थ लावून कशी चुकीची आहे ते विशद केले.

रामकृष्ण व विवेकानंदाच्या कार्याचा हा थोडासा आढावा आहे.

पण तो ज्या तांत्रिक, योगिक, साधना पद्धतीच्या योग्य परिश्रमाने झाला, त्याच्या रहस्याबद्दल किंवा उपयुक्ततेबद्दल ही कोरडी सहानुभूती वा आपुलकी आहे आणि याचे मुख्य कारण प्रचलित समाजव्यवस्थेने, शिक्षणपद्धतीने व प्रत्यक्ष व्यवहारात समाजाने दाखविलेल्या असहानुभूतीमुळे, बेफिकिरीमुळे व अज्ञानानेही आहे.

न्यूयॉर्कला 'कुंडलिनी रिसर्च' संस्था स्थापन व्हावी मग भारतात इतकी सामान्य संस्थांची उद्घाटन करणाऱ्या मंत्र्यानी एखादी तरी अशी कृती केल्याची उदाहरणे का सापडत नाहीत? समाजाच्या संपत्तीचा, जो वापरण्याचा अधिकार, राजसत्तेला येतो, तिचा 'भाव' सध्या तरी (Secular) आहे व त्यांना सत्तेबद्दल व स्वार्थाबद्दल सहाजिक प्रेम असले तरी भारतीय संस्कृती, अध्यात्म, योग याबद्दल अनास्थाच आहे. त्यांच्यावरही अविद्येचा व मायेचा भरपूर अंमल आहे त्यामुळे या घटनांना ते 'पॅरानॉर्मल' असे मनोमन संबोधतात - आजच्या भौतिकवादी विज्ञानमहर्षींच्या आवाजात आवाज मिळवून ते हा घोष करतात.

या 'पॅरानॉर्मल' आरोपाबद्दल किट पेडलर हे ब्रिटिश शास्त्रज्ञ १९८१ साली लिहितात :


"A Scientist would have to be either massively ignorant or a confirmed bigot to deny the evidence that the human mind can make connection with space, time ahd matter in ways, which have nothing to do with the ordinary senses. Further, he cannot deny that these connections are compatible with current thinking in physics, and may in the future become accepted as a part of an extended science in which the description 'paranormal' no longer applies, and can be replaced by 'normal'. (Mind over Matter - Kid Pedler)

**अंतर्मुख**

तेव्हा, कालीमातेच्या जड मूर्तींच्या माध्यमातून रामकृष्ण जेव्हा तिच्या 'श्रीमुखातून' सत्याचा अनुभव व पुरावा मिळवतात, तेव्हा नरेन्द्रचा त्यावर विश्वास बसत नाही तसाच, अजूनही त्या 'प्रक्रियेवर' नास्तिक सोडाच पण आस्तिकाचाही बसत नाही आणि ती क्रिया काही 'मेकॅनिकल' वा 'यांत्रिक' नाही. त्यामध्ये अनुभव घेणाऱ्यात रामकृष्णांची तपस्या, सरळपणा, निस्पृहता, साधना ही आवश्यक आहे हे लक्षात घेतले जात नाही. मग, त्यासाठी जी तपस्या हवी तिकडे 'नाक मुरडून' चालणार नाही. साधे 'अमिताभ बच्चनचे कौन बनेगा करोडपती' याकरिता जो तरुण वा तरुणी कष्ट, धडपड घ्यावयाला तयार आहेत. त्यांची मनोवृत्ती इकडे वळवण्याची जबाबदारी सामाजिक नेते का टाळीत आहेत? 'आध्यात्मिक आनंद व ज्ञान यात अब्जावधी व परार्धवधी संपत्ती मिळाल्यापेक्षा जास्त आनंद आहे,' या सत्यावरचा अविश्वास हेच कारण आहे.

### आदेश व भविष्य

रामकृष्णांनी नरेन्द्रला हरतऱ्हेने हे ज्ञान दिल्यावर ते त्याच्यामार्फत जगाला सांगावे, असा रामकृष्णांचा 'अवतारी कार्यातील हेतू' होता. त्यामुळे ते जेव्हा घशाच्या कॅन्सरने देहाच्या शेवटच्या अवस्थेत होते तेव्हा त्यांनी विवेकानंदाला जवळ बोलावले व एक रेखाचित्र काढले. (चित्र पहा)ते सोबत छापले आहे.



Towards the end of his earthly existence at Cossipore, Sri Ramakrishna called Naren (Later Swami Vivekananda) to his side oneday. Suffering as he was from cancer of the throat, he could scarcely speak. The Master wrote on a piece of paper : 'Naren will teach others.' Naren hasitated and said : 'I won't do that.' The Master replied : 'You shallhave todo it. ... My *siddhis* (power will manifest through you in time.' The picture here reproduces what the Master himself wrote, and reads : *Jaya Rādhe Premamayi. Naren shikshe dibe yakhan ghure bāhire hak dibe Jaya Rādhe* (Victory to Radha, Love personified. Naren will teach (others) when travelling around (he) will call out outside (India). Victory to Rādhā). The human head, drawnby Sri Ramakrishna, at left corner, is supposed tobe the Master himself (with a sore throat) and the peacock behind is said to be Naren.*

* According to some, the human head is said tobe Narcand the peacock is supposed to be the Master himself

त्याचबरोबर रामकृष्णांचा हा जो देशात परदेशात खऱ्या धर्मप्रसाराला जाण्याचा विवेकानंद यांना आदेश होता, त्यावरील विवेकानंदाचा विरोध सुद्धा ध्वनित झाला आहे.

हे वर्ष आहे १८८६ चे आणि शिकागोला विवेकानंद प्रत्यक्षात गेले ते वर्ष आहे १८९५ म्हणजे जवळजवळ ९ वर्षांनी व तेही कोणत्या असहिष्णु, आर्थिक अडचणी व प्रत्यक्ष प्रतिकूल परिस्थितीतून शिकागोला गेले हे सर्वश्रुत आहे. मग हे भविष्य का खरे झाले? ही किमया कोणाची?

### मनोगत

हा सबंध लेख तुटक वाटेल. त्यात बांधेसूदपणा दिसणार नाही. कारण इथे फक्त काही मूलभूत प्रश्न उपस्थित करणे हेच प्रयोजन आहे.

रामकृष्ण व विवेकानंद यांच्या जीवनकार्याचा खरा अर्थ एका तात्कालिक सामाजिक ऐहिक चौकटीतून पाहिला गेला आहे. हे विश्व ज्या हेतूने निर्माण झाले त्यामध्ये काही स्वसंवेद्य ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती व क्रियाशक्ती यांचा हातभार आहे, हे उघड असूनही ते आजचे विज्ञान मानत नाही. त्याचे कारण, त्यांच्या पद्धतीतील व तत्त्वज्ञानातील काही गंभीर त्रुटी व दोष आहेत ते पुढील प्रगतीला मारक आहेत.

Vedic Epistemology या ज्ञानपद्धतीचा स्पर्शही हा वर्ग करून घ्यावयाला तयार नाही. सन्मान द्यावयाला राजी नाही. त्यामुळे पृथ्वीवरील जीवांना काही हेतू व पूर्वयोजना धरून जन्म व मृत्यू व ऐहिक जीवन (जवळजवळ १०० वर्षांचे) आहे अशी 'स्कीम' ते मानीत नाहीत. इथल्या जीवनाला काही पृथ्वीपलीकडे व देहधारी जीवनापलीकडे अस्तित्व व कार्यक्रम व पुनर्जीवन असेल हे ते मानावयाला तयार नाहीत.

उत्क्रांती तत्त्वाचा त्यांचा अर्थ फक्त शरीर किंवा प्राण्याच्या देहआकारापुरताच मर्यादित आहे. माकडाचे शेपूट गेले व माणूस तयार झाला एव्हढाच शेपूटभर विचार आहे.

पण, योगी अरविंद म्हणतात त्याप्रमाणे मानवी कॉशसनेसची उत्क्रांती ही प्राणीवृत्ती किंवा त्याअगोदरची



*Narendra* : You must not tell this to anyone else. At Cossipore he transmitted his power to me.

*M.* : There is a special purpose in his transmission of power to you. He will accomplish much work through you. One day the Master wrote on a piece of paper, 'Naren will teach people.'

*Narendra* : But I said tohim, 'I won't do any such thing.' Thereupon he said, 'Your very bones will do it.'

Inconscient State पासून Divine Status दैवी कॉशसनेसकडे जाण्याची आहे असा 'हेपोथिसिसही' (Hypothesis) ते मानावयास तयार नाहीत. त्यांच्या Gnostic Society या संकल्पनेकडे एक नवा Utopia एव्हढे देखील स्थान द्यावयाला तयार नाहीत.

त्यामुळे रामकृष्ण किंवा तत्सम 'अवतार' यांच्या 'दैवी कॉशसनेस'च्या जीवनधारणेचा हेतू या अनंतातील एका सुनिश्चित प्रवासावर मानवी समाजाला 'रूळावर' आणून ठेवण्याचा आहे, अशी संकल्पना त्यांच्या मनाला शिवू शकत नाही.

'मॅटर' व मटेरिऑलिझमच्या तर्कपद्धतीत अणू, परमाणू व कॉम्प्यूटर स्वत:हून एखाद्या यंत्रपद्धतीने 'मेकॅनिकली' कालिदासाचे शाकुंतल किंवा शेक्सपियरचे हॅम्लेट लिहू शकतील, असा त्यांचा गाढा विश्वास आहे.

ते हेगेल, अरविंद वगैरेंच्या तत्वज्ञानाचा एक Idealism, Mysticism अशा शेलक्या विशेषणांनी उद्धार करतात. त्यांची 'Objectivity' व Reality ही कल्पना तोकडी व दूषित आहे. पण त्याची ते जाणीव करून घेऊ इच्छित नाहीत.

मानवी समाजाचे कुठलेही 'भौतिक किंवा बौद्धिक आदर्श' हे या एकांगी भौतिकवादी व नैतिकतेला बाहेर टाकणाऱ्या तत्वज्ञानाने प्राप्त होणार नाहीत. पण, सध्या राजकीय, सामाजिक, आर्थिक सत्ता या भौतिक विज्ञानाच्या सामर्थ्यावर विसंबून आहेत व पद्धतशीरपणे दुसऱ्या विचारांचा गळा दाबीत आहेत.

तेव्हा या महत्त्वाच्या प्रश्नांवर अंतर्मुख होण्यापुरता जरी विवेकानंदांवरचा लेख कारणीभूत झाला तरी मला समाधान वाटेल.

हे चरित्रप्रसंग ताजे आहेत, विश्वसनीय आहेत. त्यातील विवेकानंदांच्या मार्फत एका दैवी अवताराने दिलेले संदेश महत्त्वाचे व आजच्या जीवनसंदर्भाला उद्देशून आहेत. त्यात योजलेल्या विद्या-तंत्र-साधना या पृथ्वीवरील जीवाच्या खऱ्याखऱ्या प्रगतीला मदत करणाऱ्या आहेत, ही खात्री निर्माण झाली तर हा लेखनाचा उपक्रम योग्यकारणी खर्ची पडला असे मला वाटेल. हरी ओम !!

यशवंत साने

E-mail : yrsane@bol.net.in

## Bibliography


| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री रामकृष्ण लीलाप्रसंग | (तृतीय भाग) | स्वामी सारदानंद | रामकृष्ण मठ |
| 2. | Ramakrishna, Prophet of New India, New India, abridged from The Gospal of Sri. Ramkrishna | 1942 | Swami Nikhilananda (M) | Harpar & Brothers Publishers New York, London. |
| | Foreward by Aldons Huxley | 1987 | G. Ranjit Sharma M.A. PHD. | Atlantic Publishers & Distributors New Delhi - 110027 |
| 3. | The idealistic Philosophy of Swami Vivekananda | | | |
| 4. | Kundalini - A Modern View serpent of Fire Introduction by Gene Kieffer Two interwies with Gopi Krisna | 1985 Jaico 1999 | Darrel Irving | Jaico Mumbai |
| 5. | Methods of knowledge according to Advaita Vedanta | 1965 George Allen & Unwin Ltd. London Indian Edition 2nd 1974 | Swami Satprakashanad Pithoragarh | Advaita Ashrama Mayavati, Himalayas |
| 6. | Reminiscences of Swami Vivekananda by Western Admisvers | 3rd Edition 1983 | | Advanta Ashrama |
| 7. | Mind over Matter A scientists view of the Paranormal | 1981 | Kit Pedler | Thames Methuen London |
| 8. | Sri. Ramakrishna (A biography in Pictures) | 1981 | Himalaya | Advaita Ashrama |



**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँके जवळ,

अग्यारी लेन, ठाणे (प.)

दूरध्वनी: २५३६ ८४५१

# श्रीमद्‌भगवद्‌गीतार्थ

*(मराठी समश्लोकी)*

*(रचना - श्री. प्रभाकर सि. मराठे, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई - ४.*
*मार्च २००३, पृष्ठे १७६ किंमत - १०० रुपये)*

'तुझेच देवा तुलाच अर्पण' असे हे पुस्तक भगवान श्रीकृष्णास अर्पण केले आहे. यामागील कारण म्हणजे भगवंताच्या स्वप्नातील आदेशानुसार हे पुस्तक लेखकाकडून भगवंताने लिहून घेतले आहे आणि म्हणूनच हृदय उचंबळून आल्यामुळे त्याचे अर्घ्य त्यालाच नम्रपणे अर्पण केले आहे. मराठीत पद्यलेखन हा माझा प्रांत नसताना मराठीत समश्लोकी गीता माझ्या हातून लिहिली जाईल हे मला स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते. परंतु २२ नोव्हेंबरला २००१ च्या रात्री लेखकाला एक स्वप्न पडले त्यात श्रीकृष्णाकडून असे भाषांतर करण्याचा आदेश त्यांना मिळाला व ते या कार्यात ओढले गेले.

कसे हे शक्य होईल केला श्लोक कधी न मी ।
सुचविन युक्त शब्दांना, म्हणसी मागे उभाच मी ॥

अशा आशयाचा संवाद दोघात झाला आणि कृष्णाने आशीर्वादाचा हात केला त्यातून तेज बाहेर पडल्याचा लेखकाला भास झाला.

सर्व आयुष्य रेल्वेचे पूल बांधण्यात गेले. गीतेचा मी गेली १५-२० वर्षे अभ्यासक होतो. १९९७ साली गीता मुखोद्गत करण्याची मला प्रेरणा मिळाली. त्याप्रमाणे ३-४ महिन्यात मी गीता मुखोद्गत केली. गीतेची आवर्तने होत गेली तसे गीतेच्या तत्त्वज्ञानावर लेखन मी 'सद्धर्म' मधे १९९९ पासून करु लागलो. या लेखांना पुस्तक रुपात आणण्याचा माझा विचार चालू होता आणि अचानक मी समश्लोकी भाषांतराकडे ओढला गेलो. श्लोक लिहिण्याचा अनुभव नव्हता. मात्रावृत्तावद्दलही अनभिज्ञ होतो. पणएक दिवस अकरावा अध्याय म्हणताना त्याचे शेवटचे चार श्लोक म्हणू लागलो तेव्हा डोळ्यापुढे त्याचे समश्लोकी भाषांतर दिसू लागले. या सर्व अद्‌भूत घटनांमुळे मी चालीवर म्हणता येतील, असे पहिल्या अध्यायाचे श्लोक लिहू लागलो. ३-४ दिवसात अध्याय लिहून पूर्ण झाला आणि त्यानंतर अदृश्य शक्तीने झपाटल्यासारखा मी नित्य-नैमित्तिक कर्मे सोडून बाकी सर्व वेळ या कार्यात व्यग्र झालो. आश्चर्य म्हणजे दोन महिन्यात संपूर्ण समश्लोकी गीता मराठीत लिहून पूर्ण झाली. सारीच घटना अद्‌भूत. त्यामुळे कृष्णावद्दलच्या कृतज्ञतेने भारावून जाऊन त्याच आवेशात कृतज्ञता अष्टादशकाचे १८ श्लोक लिहिले. परिशिष्ट -१ मध्ये ते समाविष्ट केले आहेत. त्यानंतर परिशिष्ट-२ मध्ये पसायदान अष्टादशकही दिले आहे. गीताज्ञान नवनीत हे गीतेचे सार १२५ श्लोकात परिशिष्ट-३ मध्ये समाविष्ट केले आहे.

गीतेतील ९ व्या अध्यायातील ३० व्या श्लोकातील (अपिचेत्सुदराचारो...) अर्थात वरीच विसंगती जाणवते की हा श्लोक मागाहून कोणी घुसडला आहे की काय असे वाटते. ही विसंगती सतावत असताना त्याचे एक दिवशी उत्तर मिळाले ते महाभारतातील वनपर्वातील धर्मव्याध-कौशिकाच्या कथेत व धर्मव्याधाने नंतर कौशिकाला केलेल्या उपदेशात. गीतेतील राजगुह्ययोगाचेच प्रात्यक्षिक असे निरुपण त्यात आले आहे. परिशिष्ट-४ मध्ये ही कथा श्लोकपासष्टी या नावाने ग्रथित केली आहे.

लेखकाच्या मनोगतातून ही सर्व माहिती आपल्याला मिळते. श्री. चं.प. भिशीकरांसारख्या ज्ञानवृद्ध व गीतेवरील अधिकारी व्यक्तीची पुस्तकाला प्रस्तावना आहे. काव्यप्रान्तात नवशिक्या असलेल्या माणसाने समश्लोकी रचल्यामुळे त्यातील व्याकरणाच्या चुका व संस्कृत प्रचुर शब्दरचना झाल्याची त्रुटी प्रस्तावनाकारांनी दाखवताच लेखकाने पुन्हा मेहनत घेऊन जवळजवळ २१० श्लोकांची फेररचना केली. त्या परिश्रमांचे फलित म्हणजेच ही समश्लोकी आहे.

श्री. ना. भि.दीक्षित या स्वामी समर्थ व गीता

अभ्यासक तसेच विचक्षण बुद्धीचे परीक्षक व समीक्षक यांचा अभिप्रायही त्यात आहे. प्रकाशकाचे मनोगतात त्यांनी म्हटले आहे की मूळ गीता संस्कृत संहितेसह आम्ही गीतेचे नित्यवाचन करणाऱ्यांना आनंद व्हावा या विश्वासाने प्रकाशित करीत आहोत.

अठरा अध्याय, चार परिशिष्टे व समर्पण असे या ग्रंथाचे स्वरुप आहे. मोठ्या टाईपमध्ये समोरासमोर गीतेतील मूळ संस्कृत श्लोक व मराठी श्लोक दिलेले आहेत. एका पानावर आठ संस्कृत व समोरच्या पानावर आठ मराठी श्लोक आहेत. मोठ्या टाईपमुळे वाचकाला ते वाचण्यात आनंदच वाटेल. समश्लोकीची काही उदाहरणे बघणे उचित ठरेल. काही प्रसिद्ध श्लोकांचेच हे उत्तम जमलेले भाषांतर पहा -

श्रीभगवानुवाच - पश्य मे पार्थ रुपाणि शतशोऽथ सहस्त्रशः ।

भगवान म्हणाले - रुपे ना ना अशी माझी नानारंगाकृतीयुत ।
शतसहस्त्रशः दिव्य रुपे माझी तशी बघ ॥ ११.५

अर्जुन उवाच - संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।
त्यागस्यच हृषिकेश पृथक्केशिनिषूदन ॥१८.१

अर्जुन म्हणाला - संन्यासाचे महाबाहो जाणू मी तत्त्व इच्छितो ।
त्यागाचे वेगळे कृष्णा ऐकू मी तेहि इच्छितो ॥ १८.२

संजय उवाच - यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ १८.७८

संजय म्हणाला - कृष्ण योगेश्वर जेथे जिथे पार्थ धर्नुधर।
तिथे विजय ऐश्वर्य सत्य नीति मतें मम ॥ १८.७८

प्रस्थान त्रयींपैकी एक असलेल्याश्रीमद्‌भगवद्गीतेची ओढ स्वाभाविकपणेच जिज्ञासूंच्या अंत:करणात असते. मोठ्या विद्वानांनी आणि आचार्यांनी तर गीतेवर टीका व भाष्ये लिहिली आहेतच. पण कितीतरी सामान्य जनांनीही आपल्या मातृभाषेद्वारा गीतेचा आशय गद्य-पद्य स्वरुपात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कोणी 'स्वान्त सुखाय'ही लेखन केले आहे. विनोबांची गीताई तसेच पावसच्या स्वरुपानंदाची 'भावार्थ गीता' या रचना लोकप्रियता पावल्या आहेत.

आपल्या अभिप्रायात ना.भि.दीक्षित म्हणतात, '७०० वर्षापूर्वी मूळगीतेचे भावार्थ दीपिकेत रुपांतर करताना ज्ञानेश्वर महाराज म्हणाले आहेत,

तैसा व्यासाचा मागोवा घेतु ।
भाष्यकाराते वाट पुसतु ॥
अयोग्यहि न पवतु कि जाईन ॥ ज्ञा. १८/१७.२२

तसेच श्री. मराठे यांनी गीतेचे सुगम सुंदर समश्लोकी भाषांतर करताना ते जास्तीत जास्त बिनचूक व्हावे या दृष्टीने पूर्वसूरींच्या विचारांचा मागोवा घेतलेला आहे आणि म्हणूनच या भाषांतराला आकर्षकते व्यतिरिक्त अधिकृतता, वजन, भारदस्तपणा व ग्राह्यता प्राप्त झाली आहे.

मुळात गीता हा अद्‌भूत ग्रंथ आहे आणि श्री. मराठे यांना स्वप्नात गीतेचे समश्लोकी भाषांतर करण्याचा भगवंताचा मिळालेला आदेश ही घटनाही अद्‌भुत आहे. त्या आदेशानुसार त्यांनी मराठीत गीतेची समश्लोकी रचना केली. भगवंतानीच काव्याचा माझा प्रांत नसताना माझ्याकडून हे काम करवून घेतले. त्यामुळे या रचनेला भगवत् स्पर्श झालेला आहे. त्यामुळे निश्चितच ती अप्रतिम झाली आहे. समजण्यास सोप्या अशा समश्लोकीचा वाचकांनी जरूर आस्वाद घ्यावा.

- आशा भिडे
बी/१, विजय अपार्टमेंट,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी - २५४१ ०१४१

# रसयात्रा

*विज्ञान शाखेत शिकणारा विद्यार्थी गीतेश याने 'रसयात्रा'चे सौंदर्य जाणून घेण्याचा केलेला हा प्रयत्न. - संपादक*

मराठी रसिकांच्या मनावर अनेक वर्षे ज्यांचे प्रभुत्व राहिले ते म्हणजे कविवर्य 'कुसुमाग्रज'. १९३३ पासून त्यांचे विशाखा, किनारा, मराठी माती, स्वगत, हिमरेषा असे चौदा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. परंतु या सर्व काव्यसंग्रहांचे सार एकाच काव्यसंग्रहात समाविष्ट करण्याचा प्रयत्न 'रसयात्रा' या काव्यसंग्रहाद्वारे करण्यात आलेला आहे वा.भ.बोरकर व शंकर वैद्य या ज्येष्ठ कवींनी कुसुमाग्रजांची निवडक कविता अर्थातच 'रसयात्रा' चे संपादन करून त्यांच्या काव्यमय प्रवासाचे चित्रण केलेले आहे.

सगळ्यांचा शेवट अखेर मातीतच होतो या शतकानुशतके आपल्याकडे चालत असलेल्या निवृत्तिविचारावरच 'मातीची दर्पोक्ती' (पृ. क्र. ५९) ही कविता आधारित आहे. पण या अतिपरिचित विचारानेच येथे असे अभिनव काव्यरूप धारण केले आहे की, तो केवळ विचार न करता एक जिवंत रसरशीत प्रत्यय होतो. मृगाच्या पावसाने सचेत, उन्मत्त आणि गंधधुंद झालेले धुलिकण जणू येथे आपल्या सामर्थ्याचे संगीत गात आहेत. आपल्याला अहर्निश तुडवणाऱ्या मानवांना त्यांच्या मर्यादांची जाणीव करून देत ते सांगतात, 'तुमचा पुरुषार्थ, पांडित्य, सत्ता यांचा शेवट अखेर मातीतच आहे. श्रीमंती आणि गरीबी, पुण्य आणि पाप, नीती आणि अनीती या तुम्ही निर्माण केलेल्या सर्व द्वंद्वांवरून आम्ही सारखाच बोळा फिरवतो.' या मध्यवर्ती कल्पनेमुळे कविता लक्षणीय ठरते.

*धनवंत असू द्या, असू द्या दीन भिकारी*
*कुणि संत असू द्या वा पापी व्यभिचारी*
*इकडेच वाहते सर्वांची रहदारी*
*हो भस्म चितेवर सारी नीति-अनीती*
*मातीवर चढणे एक नवा थर अंती !*

'क्रांतीचा जयजयकार' (पृ. क्र. ६७)ही कविता म्हणजे मृत्युंजय श्रद्धेतून उगवलेले एक अमर क्रांतिसूक्त. गांधीप्रणित अहिंसक क्रांतीच्या सर्व दैवी गुणांचा उज्ज्वल आलेख समूर्त करण्यासाठी त्याचा अवतार झालेला असला तरी जगातील कोणत्याही पुरोगामी क्रांतीचे आवेशपूर्ण प्रवक्तेपण ते समर्थपणे करू शकते. भारतीय साहित्यातच नव्हे तर जागतिक साहित्यातदेखील एवढ्या तोलामोलाचे क्रांतिसूक्त क्वचितच आढळेल. येथे कवीच्या वाणीला प्रेषित्वाची प्रतिष्ठा लाभली आहे.

*कशास आई, भिजविसी डोळे उजळ तुझे भाल*
*रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल*
*सरणावरती आज आमचि पेटताच प्रेते*
*उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते*
*लोहदण्ड तव पायांमधले खळाखळ तुटणार*
*आई, खळाखळा तुटणार*
*गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !*

या ओळी तर कोणत्याही राष्ट्राला अवसेच्या अंधारातदेखील उज्ज्वल ताऱ्यांप्रमाणे अमर प्रेरणा आणि अनंत आश्वासन देत राहतील.

नाट्यात्मकता हे कुसुमाग्रजांच्या प्रतिभेचे एक खास वैशिष्ट्य. याचे प्रत्यंतर म्हणून 'जालियनवाला बाग' (पृ. क्र. ७०) ही कविता अचूक उदाहरण आहे. एरवी हजार ओळींतदेखील जो विषय नीट सांगता आला नसता तोच अवघ्या बारा ओळींत इतक्या प्रभावीपणे मांडला आहे. जालियनवालाबागेतील अमानुष हत्याकांड त्यांच्या प्रतिभाचक्षुपुढे उभे राहताच आपल्या भाईबंदांची कत्तल

झाली, या विचारापेक्षा माणसाकडूनच माणसांचा आणि माणुसकीचा नि:पात झाला ही जाणीवच त्यांना जास्तीत जास्त खोल जखम करून जाते. ज्या ख्रिस्त भगवानाने प्रेम, शांती आणि क्षमा यांच्यातच परमेश्वराचे अधिष्ठान आहे, असा आयुष्यभर उपदेश केला आणि त्यापायी क्रूसावरचे अत्यंत हृदयद्रावक असे मरणदेखील पत्करले त्याला आपल्याच पताका मिरविणाऱ्यांच्या अघोरी कृत्याबद्दल आणि त्यात त्यांनी दिग्विजय मानल्याबद्दल काय वाटले असेल हा विचार त्यांच्या मनाला स्पर्शून जातो. एवढेच म्हणून ते थांबत नाहीत तर या घटनेमुळे ईश्वरावर सैतानाची मात झाली आहे, असे उद्गार ते पुढील ओळींतून काढतात.

*पाचोळ्यापरि पडली पाहुन प्रेतांची रास*
*नयन झाकले असशिल देवा, तू अपुले खास;*
*असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात*
*एक जखम अन् नवीन येशू, तुझ्या काळजात ।*

त्यांना ती भिडतेही मोठ्या आत्मविश्वासाने आणि सहज. मराठीत सुंदर, सूक्ष्म आणि सखोल प्रेमगीते काही थोडीथोडकी नाहीत. प्रत्येक कवीने या बाबतीत आपली प्रतिभा पणाला लावून पाहिली आहे. पण पृथ्वीचे प्रेमगीत लिहिण्याचे सुचले आणि साधले कुसुमाग्रजांनाच. या प्रेमगीताची उभारणी पृथ्वीमातेला सूर्यनारायणाविषयी वाटणाऱ्या दाहक आणि उत्कट अशा भक्तिसदृश प्रेमाकर्षणावर आधारल्यामुळे पहिल्या ओळींतूनच ते आपल्याला उदात्तांच्या अंतरिक्षात घेऊन जाते.

*युगामागुनी चालली रे युगे ही*
*करावी किती भास्करा वंचना*
*किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी*
*कितीदा करू प्रीतिची याचना ।*

'सात' या कवितेतील (पृ. क्र. ८३) कथाकाव्याचे सूत्र किती लहान आहे, पण त्यातून बलिदानाचे रोमहर्षक चलचित्र कुसुमाग्रजांनी उभे केले आहे. प्रतापराव गुर्जराने रणात पाठ दाखवल्याचे कळताच महाराजांनी त्याला पाठविलेले जळजळीत पत्र, पत्रातल्या एकेक अक्षराने त्याच्या अंत:करणात उसळलेले काहूर, त्यातून उमटलेले त्याचे पश्चातापाचे उद्गार, प्रमादाच्या परिमार्जनार्थ त्याने आपल्या सरदारांसह केलेली निर्वाणीची घोडदौड, छावणीतला निकराचा हल्ला आणि रणधुमाळीच्या वणव्यात करून घेतलेली प्राणांची होळी ही एकापेक्षा एक अंगावर काटा फुलवणारी चित्रे वीर-भावनेचा पारा सारखा वाढवीत ठेवतात.

*'जरि काल दाविली प्रभु, गनिमांना पाठ*
*जरि काल विसरलो जरा मराठी जात*
*हा असा धावतो आज अरी-शिबिरांत*
*तव मानकरी हा घेउनि शीर करात'*
*वेडात मराठे वीर दौडले सात ।*

श्रान्त, हताश आणि अस्वस्थ मन:स्थितीत पुळणीत डोके टेकून कवी बसलेला आहे. किर्र काळोख आणि रातकिड्यांचा आक्रोश यांच्यामुळे त्याच्या हृदयकल्लोळात आणखीनच भर पडली आहे. अशा स्थितीत एकाएकी त्याची नजर टिळकांच्या पुतळ्यावर जाते आणि त्याबरोबर क्षणार्धात त्याच्या अंत:करणातील कोलाहल शांत होतो, असे चित्रण 'टिळकांच्या पुतळ्याजवळ' (पृ. क्र. ९५) या कवितेतून केले आहे. 'दृष्टीत डोंगरापरी भरे ती मूर्ती' 'जी पाहून सागर थबके, परते आत' दोनच ओळींतून टिळकांचे मृत्युंजय कर्तृत्व आणि जबरदस्त दरारा यांचे हुबेहूब चित्रच कवीने उभे केले आहे. या पुतळ्याचे दर्शन टिळकांचे ऊर्जस्वल जीवन आणि क्षणोक्षणी मृत्यूची उजळणी करणारे आपले पामर जिणे यांच्यातील विरोध त्याला तीव्रतेने जाणवतो.

'फेरीवाला' ही कविता (पृ. क्र. १२०) 'आ जरा पूर्वेकडे' या कवितेशी पडताळून पाहिली तर संस्कृतीचे पवाडे गात पुढारलेली राष्ट्रे जो युद्धांचा भस्मासूर उभा करतात आणि त्यातून आजवरच्या सर्व मंगल मूल्यांची जी होळी रचतात तिच्याविषयी कुसुमाग्रजांना केवढी चीड आहे, हे सहज लक्षात येते. या कवितेत युद्धाचा हा भस्मासूर प्रत्यक्ष काळच फेरीवाल्याचा वेष घेऊन आला आहे, ही कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे. त्याचे रूप, वेष, गती आणि आपला माल खपवण्यासाठी तो वापरीत असलेली थंड पण काळजाचे लचके तोडणारी भाषा आपल्या पुढे त्याच्या निर्घृण विध्वंसक सामर्थ्याचे विलक्षण नाट्यमय असे जिवंत चित्र उभे करतात. आजच्या तथाकथित संस्कृतीमागचे विदारक ढोंग शेवटच्या कडव्यात विशेष तीव्रतेने स्पष्ट होते.

*करी पुकारा दारी थांबुन*
*या सृजनांनो, सोन्याचा दिन*
*अमोल माझा माल; नको धन*
*रक्तमांस हे स्वस्त चालले*
*खुशाल या लुटण्याला !*
*आला आला फेरीवाला !*

पक्षी ही कुसुमाग्रजांची आणखी एक लाडकी कल्पना. निळा पक्षी या कवितेत त्यांनी जी कल्पना आणि तिच्याशी संबंध्द असलेली जी व्यथा आळवली आहे तिचाच अधिक विकसित आविष्कार आपल्याला 'तो पक्षी' (पृ. क्र. १७२) या कवितेतून आढळतो.

*त्या पक्षाच्या*
*उरात शिरला शर कोणाचा*
*कळले नाही*
*असेल माझा -*
*ही शंका मज जाळित राही*

*कुणास ठाऊक, एके दिवशी -*
*निखारलेल्या सुन्न दुपारी -*
*त्या पक्ष्याच्या पंखपिसांची अभद्र पखरण*
*धुळीमध्ये पडलेली मजला*
*दिसली दारी*

*अशा रीतीने या विविध काव्यसंग्रहात विखुरलेल्या उत्तमोत्तम अठ्याहत्तर कविता एकत्रित करण्याचे काम संपादक बा.भ.बोरकर व शंकर वैद्य या ज्येष्ठ कवींनी 'रसयात्रा'द्वारे केलेले आहे.*

- गीतेश गजानन शिंदे
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉलजवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.)- ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ १५१९

दिशा
नियमित वाचा
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# परिसर वार्ता

## 'युवाशिल्प' - वाचनीय वार्षिक

ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाचा 'युवाशिल्प' विशेषांक एका साध्या समारंभात अनौपचारिक रीतीने अलिकडेच प्रकाशित झाला. विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या आकस्मिक निधनाच्या पार्श्वभूमीवर अंक साधेपणाने प्रकाशित करण्याचा निर्णय उचितच होता. अंक उघडताच डॉ. वा. ना. बेडेकरांचे संपूर्ण पान रंगीत छायाचित्र देऊन व मागील बाजूस मोजक्या व नेमक्या शब्दात श्रद्धांजली वाहून संपादक मंडळाने व महाविद्यालयाने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

वार्षिक अंकाचे मुखपृष्ठ या वर्षातील सर्वात महत्वाच्या अशा आंतरविद्यापीठीय खो-खो सामन्यातील विजेत्या संघाचे छायाचित्र दर्शविणारे आहे. त्या छायाचित्रावरच संघाला मिळालेले मानचिन्हही सुबक रीतीने दर्शविले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व वृत्तपत्रांत मिळालेल्या प्रसिद्धीपर बातम्यांचे कोलाजही आकर्षक ठरले आहे. युवाशिल्पचे मलपृष्ठही असेच उल्लेखनीय ठरावे असे आहे. संयुक्त राष्ट्राने हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्वच्छ पाणी वर्ष (२००३) म्हणून पाळले. त्या संदर्भातील चित्र अतिशय उत्तम रीतीने छापलेले आढळते.

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयास 'नॅक'चा बीआरटी हा दर्जा महाविद्यालयास मिळालेले प्रमाणपत्र दुसऱ्या कव्हरपेजवर दिलेले आहे.

अंकातल मजकुराची विभागणी पाच भागांमध्ये करण्यात आली आहे. पहिल्या भागात महाविद्यालयातील गतवर्षीच्या घडामोडींचा सचित्र परामर्श घेण्यात आला आहे. या भागातील 'माझी प्राचार्यपदाची दहा वर्षे - एक सिंहावलोकन' हा गोखले सरांचा लेख अतिशय चांगला उतरला आहे. आपल्याच कारकिर्दीकडे तटस्थपणे पाहून या कारकिर्दीतील घटनांचा परामर्श घेणे हे अवघड काम आहे. प्राचार्य गोखले सरांनी हे अतिशय उत्तमपणे केले आहे. लेखातील भाषेतून त्यांची प्राचार्यपदाविषयी प्रकट होणारी प्रगल्भ जाणीव, साधी पण ओघवती भाषा यामुळे हा लेख दीर्घकाळ लक्षात रहाणारा आहे. 'लोकशाहीला जसे चार स्तंभ असतात त्या धर्तीवर महाविद्यालयातही विद्यार्थी व पालकवर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, व्यवस्थापन आणि ग्रंथालय असे चार स्तंभ सांगता येतील.' या साध्या वाक्यात सराची कार्यपद्धती स्पष्ट होते.

या महत्त्वाच्या लेखाशिवाय विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ, प्रत्येक शाखेतील यशस्वी विद्यार्थी इ. माहिती आहे.

पुढील मराठी विभागात विद्यार्थ्यांचे मराठीतील साहित्य आहे. या साहित्याचे विषय निसर्ग, राष्ट्रप्रेम, भ्रष्टाचार असे अनेक प्रकरचे आहेत. तरुण पिढीचे वाचन व चिंतन समजावून घेण्याच्या दृष्टीने साहित्याचे संपादन चांगले झाले आहे.

इंग्रजी, हिंदी व संस्कृत या भाषा विभागातील साहित्याच्या विषयांत वैविध्य आढळते.

लेखांमध्ये छायाचित्रांचा केलेला योग्य वापर, विशेष म्हणजे लेखाच्या सुरुवातीस लेखकाची दिलेली छायाचित्रे यामुळे लेखांना उठाव आला आहे. साहित्याचा एकूण दर्जा महाविद्यालयीन स्तराचा असला तरी चांगला आहे.

संपादक मंडळाचे प्रमुख स्वत: प्राचार्य आहेत तर प्रा. अनिल भावड प्रमुख संपादक आहेत. संपादकीयात प्रा. भावड यांनी सर्व सहकाऱ्यांना श्रेय दिले आहे.

नेटके संपादन, उत्तम मुखपृष्ठ यामुळे युवाशिल्पच्या परंपरेत आणखी एक चांगले वार्षिक वाचावयास मिळाले आहे यात वाद नाही.

प्रा. मोहन पाठक